खंड ।। अंक 2 व 3

# चैतन्य लहरी

१९९०

मराठी आवृत्ति






"आपण आतां लाटेच्या टोकावर आहोत जिथून आपण दुस-या लाटेवर उडी मारणार आहोत; जी या लाटेपेक्षा ब-याच उंचीवर आहे. पण तुमची ती लायकी पाहीजे. तुम्ही जलपर्यटनास योग्य नसलात तर तुम्ही बुडाल."

- श्री माताजी निर्मलादेवी

श्री माताजींचे पुण्याच्या जाहीर सभेतील भाषण :-

सत्याला शोधणा-या सर्व साधकांना आमचा नमस्कार. सत्य काय, आणि असत्य काय हे सुध्दा जाणण्यासाठी आत्मसाक्षात्कार पाहिजे. ज्यांना आत्मसाक्षात्कार आला नाही, त्यांच्याबद्दल कबिराने म्हटलं आहे, "कैसे समझावूं, सब जग अंधा।"

आत्मसाक्षात्काराशिवाय ती सूक्ष्मदृष्टी येत नाही, ज्यांने चराचरांत पसरलेली ही परमेश्वरीशक्ति आपण जाणू शकतो. कोणीही उठावं, आणि म्हणावं परमेश्वर नाही, हे आजकालचचे प्रकार आहेत, पण हे अशास्त्रीय आहे. तुम्ही त्याबद्दल कांही माहिती घेतली कां? तुम्ही त्याबद्दल कांही गहनतेने विचार केला आहे का? आणि सगळ्यांत कमालीची गोष्ट आहे की हा संबंध वारसा ह्या महाराष्ट्राचा आहे. या महाराष्ट्रांतच हे सगळं कार्य झालेल आहे एकेकाळी. आणि तेच कार्य आम्ही करत आहोत. फरक एवढाच की सामूहिकतेत आम्ही हे कार्य करीत आहोत आणि पूर्वी एकेका माणसाचं हे कार्य होत असे.

पण कुंडलिनी जागृतिनंतर तुम्ही आकाशांत उडता किंवा पाण्यावर चालू शकता असले प्रकार मी कधीही म्हटले नाही. उलट ह्याच्याशी विरोधात आहे कारण ह्या क्षुद्र सिध्दया आहेत. आणि श्री ज्ञानेश्वरांनीपण असं कसं म्हटलं असेल बरं, त्यांच्याबद्दल बोलतांना लोकांनी जीभ आवरावी ते बरं. पण काय म्हटलं तरी, काय ती किर्ति। त्यांच्या दोन ओळीतरी तुम्ही लिहू शकतां का? ते त्यांच्यावर कोरडे ओढतायत। दोन अक्षर इंग्लिश शिकून तुम्ही मोठे शहाणे झालांत?

लहानपणी मी ज्ञानेश्वरी वाचली होती आणि म्हटलं काय हे अवतरण आहे, अवतरण आहे नुसतं, ते काय समजेल माणसाला? आत्मसाक्षात्कार झाल्याशिवाय तुम्हांला कांहीही कळत नाही, आणि त्याच्या पलिकडच्या ह्या गोष्टी आणि तुम्हाला काय कळणार, ही मंडळी कोण होती. आणि सांगायला गेलं तर, "तुम्ही खोटं सांगतां" कारण हे अतिशहाणे, त्यांचे बैल रिकामे। त्यांचे अमृतानुभव हे पुस्तक तुम्ही वाचावं ते पुस्तक मी जवळजवळ रोज थोडसं वाचते. खरे अनुभव, इतके गहन अनुभव आहेत पण ते सगळ्यांना, सगळ्यांना समजण्यासारखं नाहीच. सूक्ष्म बुध्दी पाहिजे. त्यांच्यात एक सूक्ष्मता पाहिजे. आत्मसाक्षात्कारी मनुष्यच ते समजू शकतो.

आणि त्याबाबतीत भलताच अट्टाहास करुन मला आवाहन दिलं की तुम्ही जर पाण्यावर चालायला सांगाल, मी कधीच सांगत नाही ते टी.एम वाले सांगतात, ट्रान्सेडेन्टल मेडिटेशन. त्यांनाच जाऊन अपोजिशन करा न. त्यांना करणार नाही. कारण त्यांचा सौदा पटू शकतो. माझ्याबरोबर या अशा गोष्टी मी असं कधीही म्हटलेलं नाही. कुंडलिनीने जे ज्ञानेश्वरीत म्हटल आहे की मनुष्याची प्रकृति ठीक होते. चेहऱ्यावर सतेजता येते. जीवनामध्ये संतुलन येते. ती सर्व कार्ये सहजयोगामध्ये होतात.

आता ही, इथे जी मंडळी गाणी म्हणत बसली होती, ती तुम्हाला काय निर्बळ वाटतात? की सबळ वाटतात? मी म्हणते, हे जे लोक असं म्हणतात, त्यांना सगळ्यांना ओळीने उभं करा आणि एका सहजयोग्याला बघा. आश्चर्याची तर गोष्ट अशी आहे की या पुण्यामध्ये हे लोक, खरोखर एखाद्या विहीरीत रहावं तसे राहातात म्हणजे काहीही माहीती आमच्याबद्दल काढली नाही. दिल्लीला डॉक्टर्सना एम.डी.ची पदवी मिळाली कारण त्यांनी काही काही रोगांवर प्रयोग केले. त्यातला पहीला जो होता तो फिजीकल फिटनेस, म्हणजे त्याने मनुष्याची तब्येत किती चांगली होते, प्रकृति किती सुधारते, यांच्यावर त्याने थिसिस केला. त्याला एम डी ची पदवी मिळाली. दुसरा त्याने केला होता तो एपिलेप्सी आणि अस्थमावर. एपिलेप्सी काय आहे, किंवा अस्थमा काय आहे, हे सायकोसोमॅटीक डिसीझेस कसे असतात, ते सगळे त्याने काढून आणि सिध्द करून दिलं, की सहजयोगाने ते ठीक होतात. तिस-या डॉक्टरने, मला असं वाटतं की स्ट्रेस आणि स्ट्रेनवरती फार काम केलेल आहे. तिघांनाही एम.डी.च्या पदव्या मिळाल्या.

अहो, मला समजत नाही, हे तुमचे मि.मानव मला भेटायला आले होते. त्यांचे तर ज्ञानच जेमतेम आहे. पहिल्यांदा त्यांच्याशी बोलायच, तर कसं? त्यांना मेडीकलच एकही अक्षर समजत नाही. सायन्सचं दुसरं अक्षर समजत नाही. मी पिरीऑडिक लॉजवर बोलायला गेले, तर त्यांना काही समजल नाही. काहीही समजत नाही. तीन तास बसून, त्यांना मी सगळे समजावून सांगितले की आंतमध्ये कुंडलिनी काय असते, कशी असते. उठल्यासुटल्या प्रत्येक माणसाने अशी संस्था काढायची पैसे बनवण्यासाठी. गव्हर्मेंटकडून पैसे उकळण्याचे धंदे आहेत. ज्या लोकांना आत्मसाक्षात्कार झाला नाही ते डोळस नाहीत. ते स्वतः आंधळे आहेत आणि आंधळ्यांच्या हातामध्ये तुम्ही लाठी दिली, तर तो सगळ्यांना एकसारखा मारतो. त्यात खरं खोटं काय कळणार?

फक्त आत्मसाक्षात्कारी लोकांचा अधिकार आहे. ही अनाधिकार चेष्टा आहे आणि मी ह्या बाबतीत निर्मूलनाच्या ह्यांना घेणार आहे. आता त्यांनी आम्हाला आव्हान दिलं आहे. असल्या भलत्या गोष्टींसाठी आव्हान घेण्यात काय अर्थ आहे? पण माझं आव्हान हे आहे की ज्या गोष्टी मी म्हटलेल्या आहेत त्यावर तुम्ही नाही अशा सिध्द करून दिल्या, की हे खोटं आहे तर मी तुम्हाला दोन लाख रुपये देईन सगळया लोकांना.

आज हजारो लोकांना सहजयोगाने फायदा झाला. या आपल्या देशामध्ये, जिथे इतकी गरिबी आहे, जिथे कोणाचा इलाज होणं किती कठीण आहे. आतां हे श्रीमंत होते, म्हणून

त्यांना उभं केलं मी कारण, त्यांचं तुम्ही ऐकाल. पण किती गोरगरिबांना मी ठीक केलं आहे, किती लोकांचा फायदा झाला आहे, अनंत आहेत. त्यांची प्रकृति ठीक झाली पाहिजे. त्यांच्यासाठी डब्ल्यू.एच.ओ. तून आम्हांला निरोप आला होता, पण मी म्हटल मी कोणाचं अंगीकृत राहू शकत नाही.

आणि आता रशियाला आम्हाला सरकारी रेकग्निशन मिळाली आहे. आमचं काम बघून, सात डॉक्टर्सनी लंडनमध्ये रिसर्च केला. ते बघून त्यांनी आम्हाला सरकारीरित्या आमचाच एक ऑर्गनायझेशन संबंध रशियात एकच आहे जो, बाहेरचा असून त्याला गव्हर्मेंटने रेकग्निशन दिली आहे. ते आम्हाला जमिनी देणार आहेत. तिथे हजारोंनी लोक येतात आणि इथे अतिशहाणे, जे तुमच्या पुण्याला बसलेलं आहेत, ते कुणाचं भलं करीत नाहीत आणि कोणी करतंय तर त्याच्यामागे हात धुऊन लागतात. हे कायतरी राजकारणी प्रकार दिसतो आहे मला.

सुरवातीला ते सकाळचं पेपर माझ्यामागे लागलं होतं. आम्ही सगळ्या परवानगी घेऊन, एक घर बांधायला, या पुण्याला "पुण्य पठणम्" म्हणतात, म्हणून आम्ही आलो. कुठून हे पुण्य पठणम् आहे? तर त्याच्या सगळ्या परवानग्या घेतल्या. सगळं विचारलं, माझ्या यजमानांना दोन लॉच्या डॉक्टरेटस् मिळाल्या आहेत. एक इंग्लंडला, एक इंडियाला, त्यांना विचारून, सगळं व्यवस्थित. आम्ही कायद्यांत राहाणारी माणसं, आणि आमच्यामागे हात धुऊन लागलेत हे सकाळवाले, इतके, की ते घर मोडायच्या मागे, कारण तिथे बिल्डर्सना ह्यांनी जमिनी विकलेल्या होत्या आणि बिल्डर्सकडून अजूनही पैसे घेत आहेत हे लोक आणि त्यांच्या पोटावर पाय आला कारण मी काय एन.ओ.वगैरे करून घेतलं नाही, आणि कायदा आला. त्यांच्या पोटावर आला पाय। मग मला काय माहीत, मला जर आधी म्हटलं असतं की इथे आम्ही असे धंदे करणार आहे, बाबा, मी कुठेही गेले असते, माझ्यामागे हात धुऊन एक वर्ष, खोटंनाटं अगदी अजिबात खोटं लिहीलं आणि खोटं बोलायला तर कांही लागतच नाही. हे तुमचे मानव तर इतके खोटं बोलतात आणि मला म्हणे कुंडलिनी माझी जागृत करा. अशा माणसाची कुंडलिनी सात जन्मांत कधी जागृत होणार नाही. आणि ह्या माणसाला तुकारामांचे किंवा ज्ञानेश्वरांचे पायतरी धरतां येतील कां? काय आहेत बोलायच्या गोष्टी. कोणीही उचलायचं तोंडाला लगाम द्यायचा नाही। वाट्टेल ते बोलायचं, कोणाच्याही विरुध्द। आणि कोणाचीही मनं दुखवायची.

अहो, त्या महंमद साहेबांच्याबद्दल एक अक्षर तो रश्दी बोलला, एक अक्षर तो बोलला तर सारे ते मुसलमान लागले आणि आपल्या इथे या संतसाधूंच्या विरुध्द हे लोक बोलायला, ह्यांना काय ज्ञान आहे? हे काय आत्मसाक्षात्कारी आहेत? हे समजतात काय स्वतःला?

इतक्या वर्षांपासून ज्या लोकांनी आत्मसाक्षात्काराची एवढी खूण सांगीतलेली आहे, त्यांना सगळ्यांना मूर्खात काढलं ह्यांनी? रामदासस्वामींनी सांगीतलं होतं की कुंडलीनीच्या जागरणाने माणसाचा संबंध परमेश्वराशी होतो. योग होतो. त्यांना विचारलं की किती वेळ लागेल. त्यांनी एकच शब्द सांगितला की "तत्क्षण" पण अधिकार पाहीजे त्याला आणि घेणाराही थोडा बहुत अधिकारी असला पाहिजे.

तीन तास या गृहस्थाला मी समजावत बसले, कसंकसं समजावलं पण अगदीच ज्ञान जेमतेम आहे त्यांचं. मग यांची पूर्वीपठीका कळली की हे वर्धाजेलमध्ये कांहीतरी उपद्रव केले, म्हणून बंद झाले होते आणि मग त्यांनी असं म्हटलं, की मला इथले जेवण आवडत नाही. तर मग जेलरसाहेब म्हणाले, "बरं मग तुमचं घरून जेवण मागवतो. जेवण सोडलं त्यांनी. तर घरून जेवण आलं. मग हे थंड होतं. मग म्हणाले, "तुम्ही क्षमा मागा आणि जा" तर जेवणांसाठी, क्षमा मागून निघाले. ही यांची पूर्वीपठीका. कुठेही कांही धंदा नसला, की काढायची अशी ही कांहीतरी संस्था, आणि त्या संस्थेचं महत्व करायचं.

स्वतःबरोबर एक गृहस्थ घेऊन आले म्हणे. "हे गडकरी" मी गडकरींना कधी भेटले नव्हते. तो काही गडकरी मनुष्य नव्हता. सारखं खोटं बोलत होते. इतका खोटा मनुष्य आज उठून ज्ञानेश्वरांवरती इतकं बोलतो. अहो, त्यांच्या पायाच्या धुळीची लायकी नाही तुम्हाला. आणि खबरदार, परत जर कोणी केलं तर सरोखर मी या लोकांवर केस करीन. तर आतापर्यंत मी म्हटलं होतं. जाऊ द्या, क्षमा करा. महामूर्ख आहेत सगळे। समजावून सांगता सांगता मला पूरेवाट झाली. यांना कांहीही समजत नाही.

हो, हे कबूल आहे की अंधश्रध्दा आहे. त्याबद्दल मी जवळजवळ एकोणीसशे सत्तर सालापासून स्पष्ट सांगते आहे, भोंदू लोक आहेत, हेही सांगते आहे. इतकंच नाही, जे जे खराब गुरू आहेत त्या प्रत्येकाच्याबद्दल मी सांगीतलं आहे आणि अंधश्रध्दा कशी असते, ते ही मी सांगीतलं आहे. त्याचा मला अधिकार आहे नृसिंह सरस्वती होते, त्यांना अधिकार होता. अशी जी मंडळी होती, त्यांना अधिकार होता. यांना काय अधिकार आहे? कोणीही उठाव धर्मावर बोलाव? कोणीही उठावं आणि देवावर बोलाव? यांना अधिकार काय?

मला समजत नाही या पुण्यामध्ये असे न्यूजपेपर चालतात तरी कसे, हे बेजबाबदार। म्हणजे लोकच गडबड आहेत. लोकसत्ता म्हणे, ही लोकं बसलेली, ही लोकं नाहीत. चारपांच पोरं कुठूनतरी आणली आणि पैसे देऊन त्यांना उभं केलय तर ही लोकसत्ता झाली? नी हे केसरी, टिळकांच्या वेळचं लिहिलेलं केसरी आज सकाळचं त्याने बेजबाबदारपणे छापून दिलयं

आम्हाला काहीही न विचारतां, आम्हाला एक अक्षराने त्याने विचारलं नाही कारण त्यांना माहीत आहे, माताजींना सगळं माहीती आहे म्हणून. त्याच्याजवळ टेप्स् नव्हत्या त्या टेपस् दिल्या. मग टेपरेकॉर्डरपण दिला. टेप करून घ्या म्हणून. मग घरी जाऊन तुम्ही विचार करून मग अहो डोकं तर पाहीजे समजायला. हे गंभीर विषय आहेत आणि गहन आहेत. डोकं कमी आहे. डोकं पाहीजे त्याला.

पण मला आश्चर्य वाटतं, हे पुण्यपठणम् हा आपला वारसा, महाराष्ट्राचा, अहो मुंबईला हे लोक येतात. हे मोठे मोठे विद्वान आहेत यांच्या पायाच्या धुळीबरोबरचे नाहीत हे लोक? इतके सुशिक्षित, शिकलेले लोक इथे येतात. तुमच्या मुंबईला येऊन नमन करतात, डोकं टेकतात तिथे, ही योगभूमी, हे कळणार कसं?

आतां भूतं आहेत की नाही इथपर्यंत लोकांचं चाललेलं आहे. पण ही भूतं नाहीत कशावरून त्याची सिध्दता आहे. पण आत्मसाक्षात्काराशिवाय होत नाही. आत्मसाक्षात्कारानंतर, जर तुम्ही आकाशात पाहील तर तुम्हाला चैतन्यही दिसूं शकत आणि है, ज्याला तुम्ही "डेड स्पिरीटस्" म्हणता ते ही दिसू शकत. ते असे लूपस् मध्ये असतात. मागेच बरेच दिवसांपूर्वी मी सांगितल होतं की हे जे "डेड सोलस्" आहेत. असे सात सात लूपस्मध्ये असतात आणि आपल्यामध्ये जो सेल आहे, त्याचेपण सात लूप्स असतात आणि आपल्या सेलमध्ये {पेशीमध्ये} दिसतात. परवा एक आमचे डॉ.मिश्रा म्हणून आहेत, फार मोठे विद्वान आहेत, कॅनडाला. त्यांनी मला लिहून पाठवलं, "माताजी, याचा शोध लागला. याचा शोध लागला". लोक सांगतात की सात लूपस् आहेत सेलमध्ये* आतां सात लूप्स काय. दूसरी गोष्ट मी सांगीतली होती, कार्बनचा ॲटम धरला, त्यांना काय माहीत कार्बन काय आणि काय अगदीच काही माहीत नाही हो, बिलकुलच अगदी. आमच्याकडचे चपराशी बरे, असे आले तिथे. म्हटलं कार्बनला व्हॅलन्सी किती असते? व्हॅलन्सी काय असेल. ते ही माहीत नाही. कार्बनला चार व्हॅलन्सीज असतात. म्हटलं की कार्बन हा मुलाधार हे चक्र आहे— त्याचा मूळ धातू, कारण तिथूनच मग अमायनो ॲसिडस् वगैरे बनतात. आधी ऑरगॅनिक केमिस्ट्रीमध्ये मग त्याच्यानंतर ते अमायनो ॲसिडस् नंतर बनतात. यांना ते काहीच माहीती नव्हतं. बरं त्या कार्बनमध्ये चार व्हॅलन्सी असतात. गणपतीला आपण नेहमी चत्वारी म्हणतो. चार हात आहेत त्याला, तसेच आपले पेल्व्हीक प्लेक्सस, त्यालासुध्दां चारच पाकळ्या. मी म्हटले की तुम्ही कार्बन ॲटमचे मॉडेल बनता. तर वरळीकर म्हणून एक फार मोठे सायन्टिस्ट अमेरीकेला आहेत. इंडियन, त्यांना

फार मोठं पारितोषिक मिळणार होतं ते मिस झालं. त्यांना मी म्हटल तुम्ही यावर रिसर्च करा. त्यांनी मग स्टडी केला. आणि योहान म्हणून दुसरा एक मोठा सायंटीस्ट आहे. त्यांना मी म्हटल तुम्ही कार्बनच्या ॲटमचे एक मोठ मॉडेल बनवा. तो मॉडेल बनवला आणि मी जसं सांगीतलं होतं की तुम्ही जर याला डावीकडून पाहीलं तर उजवीकडे तुम्हांला ओंकारासारखे दिसेल आणि उजवीकडून पाहीलं, डावीकडे तर तुम्हांला ते स्वस्तिकासारखे दिसेल आणि खालून वर पाहील तर तुम्हाला ते क्रॉससारखे दिसेल ते सिध्द झालं.

आता आम्ही काहीही सांगीतलं तर ते जेमतेमच सांगतो कारण तितकं ते झेपलं तर पाहीजे तुम्हांला! सगळं सांगून काय उपयोगाचं? झेपलं पाहिजे ना; डोक्यात तर गेलं पाहिजे ना, कितीतरी सहजयोगांत चमत्कार घडलेले आहेत. ते सहजयोग्यांना माहीत आहेत, पण आत्मसाक्षात्कार झाल्याशिवाय काही आम्ही त्याबद्दल कोणाला सांगत नाही. आतां ह्यांनी म्हटलं, "मी बोलतोच". म्हटलं "बोल!" तिथे राहुल बजाजला विचारा तुम्ही फोन करून. किती लोकांना आम्ही बरं केलंय, यांनी कोणाला बरं केलंय ते सांगा तुम्ही मला. नसत्या उत्तापे-या करायला आणि आतां गव्हर्मेंट कडनं पैसे मागितलं,"आम्ही हे करतोय आम्हाला द्या म्हणून."

अंगात भुतं येतात ही गोष्ट खरी आहे. आतां कोणी खोटं केलं तर खोटं करूं शकतात पण हे पैसे मिळवण्यासाठी पुष्कळ लोक धंदे करतात. मी काही कुणाकडनं पैसे घेत नाही काही नाही, मी कशाला हे धंदे करीन? रात्रंदिवस आम्ही वणवण इकडे तिकडे भटकतो आणि तुमच्या पुण्यांत हे उपटसुंभ माझ्यामागे हात धुऊन लागले आहेत. यांनी कोणाचं भलं केलं? हे विचारा आतापर्यंत. उद्या मी प्रेस कॉन्फरन्स घेतली आहे आणि तिथे मी विचारणार आहे की, आज सकाळी यांनी असं छापायला काय झालं होत मला न विचारतांना? मी ज्या गोष्टी म्हटल्याच नाहीत, त्या ज्ञानेश्वरांना मध्ये घालून, ते खोटं आहे म्हणजे इतका खोटेपणा, सर्रास! करणारच, कारण "देव नाहीच आहे मुळी.! आमच्या देवावर विश्वास नाही." मग काय - "दारू प्या, बायका ठेवा म्हणजे देवावर विश्वास नाही ना आमचा! मग, वाट्टेल ते करा, खोटं बोला, सकाळपासनं संध्याकाळपर्यंत, पैसे घ्या, पैसे द्या," सगळं हेच! एकदां देवाला उचलून ठेवायचं म्हणजे भिती कोणाची राहणार? गव्हर्मेंटची तर काहीं भितीच नाही आहे यांना!

आणि देवाला उचलून काढून टाकण्याचा प्रकार, मोठया आश्चर्याची गोष्ट आहे की देवावर आमचा विश्वास नाही, आम्ही समाजवादी म्हणून जे धिंडवडे निघाले ते बघा, त्याला एक कारण हे की देवावर विश्वास नव्हता, देवाचा आशिर्वाद कसा येणार तुमच्याकडे? देव नाही असं म्हणायला, पहिल्यांदा तुम्ही कांही पत्ता काढलाय कां त्याचा? ज्यांनी देव देव म्हटलं, ते सगळे मूर्खच होते वाटतं? आणि हे अतिशहाणे आतां बोलायला लागले, यांची कसली कुंडलिनी आतां जागृत होणार?

तरी मी त्याला इतका तीन तास वेळ दिला कारण आमच्या ऑफीसचे एक गृहस्थ होते, "शिपिंग कॉर्पोरेशनचे", त्यांनी म्हटलं की "माताजी, त्याला समजून सांगा, त्याचं डोकं, अहो, पण त्याला डिस्क्रीशन पाहीजे ना, तारतम्य। काकः कृष्णः पिकः कृष्णः

को भेदो काक पिकयोः

वसंत समये प्राप्ते, त्याला तारतम्य पाहीजे ना?

"हंसः श्वेतः बकः श्वेतः

को भेदो हंसबकयोः

निरक्षीर विवेकेतु हंस हंसः बकः बकः।"

निरक्षीर विवेक यायला पाहीजे ना माणसाला। ज्याने उठावे, त्यानेच कांहीतरी टूम काढायची, ज्याने उठायचं त्याने, देव नाही म्हणे! आणि या भारतात, आणि या महाराष्ट्रांत, इथे प्रत्येकाच्या हृदयामध्ये देव बसलेला आहे, अशा गोष्टी करतां तुम्ही? आणि इलेक्शन जिंकायचं आहे? कधीच जिंकू शकणार नाहीत, आणि जिंकले तरी बेकार आहेत. परमेश्वराचा ज्याला विश्वास बसत नाही, त्याला कधीही यश येणार नाही. कारण परमेश्वर हा चराचरांत आहे. सगळीकडे त्याची सृष्टी आहे. जेव्हां तुम्हाला आतां हाताला लागेल तेव्हां तुम्हाला कळेल. हे मी म्हणते आहे. परमचैतन्य ते सगळीकडे पसरले आहे. ते हाताला लागलं पाहीजे, समजलं पाहीजे. "केल्याने होत आहे रे" पण "ये-या गबाळ्याचे काम नोहे" आज हे तुमचे धुरंधर झाले. अशा ये-या गबाळ्यांना तुम्ही धुरंधर बनविले आहे. ते बघून घ्या. म्हणजे तुम्ही जाणार कुठे ते बघून घ्या.

देवाचा मार्ग जो आहे, तो आम्ही सोपा केला एवढंच. कुंडलिनी जागृति आम्ही सोपी केली, एवढंच. ते नानक काय खोटं बोलत होते काय? की कबिराने सगळं खोटं सांगितलं काय? की सबंध कुंडलिनीचं वर्णन करून ठेवलं आहे. ते सगळे खोटे होते?

अहो त्या कुंडलिनीचं उत्थानसुध्दां तुम्ही कांही कांही लोकांच्यात बघूं शकतां, तिचं चालणं सुध्दां। आज इथे सगळे डॉक्टर आणि सगळे बाहेरून आले आहेत ते वेडे आहेत वाटतं, पुण्यांतच चार शहाणे बसलेले आहेत. देवावर उठवायला. त्या रशियांतसुध्दां मी देवाच्या गोष्टी केल्यावर, तेव्हां त्यांनीसुध्दां नम्रपणे मानून घेतलं की माताजी देव आहे. जेव्हां त्यांच्या हातांत

परमचैतन्य लाभलं, तेव्हां ते म्हणाले, "आमचं चुकलं, आजपर्यंत आमचं जे झालं ते चुकलं, आजपर्यंत आम्ही विश्वास ठेवला नाही देवावरती. आमचं चुकलं होतं. आता बघा आम्हाला हातावर चैतन्य येतयं, पण ते लोकं फार विद्वान आहेत हो, एका माणसाने श्रीचक्राचं संबंध कॅलक्यूलेशन काढून मॅथमॅटिकल कॅलक्यूलेशन दाखविलं आणि मी त्याला सर्व सांगितलं तेव्हां त्याला इतकं आश्चर्य वाटलं, तो म्हणाला मला आजपर्यंत हिंदुस्थानातूनसुध्दा कोणी असा माणूस भेटला नाही ज्याला श्रीचक्रांच नांव माहीत आहे. हो म्हटलं आहे तसंच तिकडे, सगळे साहेब झालो ना, आता।"

ही कुंडलिनी आपल्यामध्ये आहे. त्रिकोणाकर अस्थीमध्ये बसलेली आहे, आणि ही शुध्द इच्छा आहे. बाकीच्या इच्छा इकॉनॉमिक्सच्या सायन्सप्रमाणे कधीही तृप्त होत नाहीत. 'नेव्हर सॅक्षीएबल' एक आधी मग दुसरी, मग तिसरी, त्याचं, जनरल सांगते. त्याचं जनरल स्टेटमेंट असं आहे की, "इट इज नॉट सॅक्षीएबल इन जनरल" आणि हे आपल्याला माहीतच आहे. आज हे पाहीजे, उद्या ते पाहीजे, परवा ते पाहीजे, पण एकच इच्छा अशी असते की जी एकदा जागृत झाली की समाधान, जे म्हणतात, ते मिळतं. पण त्यांच्यात किती गोष्टी होतात.

आता हे जे म्हणले ते बरोबर आहे असं पुष्कळांना बरं केलयं मी. पुष्कळ तर प्रोग्रॅमला येऊनच ठीक झाले. कुंडलिनीचं जाग्रण झालं की ती सहा चक्रांमधून निघते आणि सहा चक्रांत जे काही दोष आहेत ते निघून जातात. हे सगळं सूक्ष्मांतून, सर्व चक्रांतूनच आपल्याला शक्ति मिळत असते. पॅरासिम्पथॅटिकची नर्व्हस सिस्टिमची. पण ज्यांनी पॅरासिम्पथॅटिक नव्हर्स सिस्टिम कशाशी खातात, हे समजून घेतल नाही, त्यांना काय सांगायचं. मग ती चक्रं आपण स्वच्छ केली आणि कुंडलिनीच्या जागरणाने ती चक्र ठीक झाली तर मनुष्य आपोआप ठीक होणारच। त्यांच्यात काय असं मोठं झालंय।

मानसिक रोग, आता काय, अशा कितीतरी मोठया रोग्यांना आम्ही ठिक केलेले आहे असे रोग जे ठीक होऊ शकत नव्हते, ते आम्ही ठीक केले आहेत. पण लोकसुध्दां अगदी लहानलहान गोष्टींवरती भरकटतात. विशेषतः जे दारू पितात त्यांना देवाच्या गोष्टी केलेल्या आवडत नाहीत कारण, मग म्हणू आपण की देवावर विश्वास ठेवतां, मग दारू कशाला पिता? मी तसं काही म्हणत नाही. नाहीतर अर्धे लोक उठून जायचे। तुमची कुंडलिनी जागृत झाली की तुम्ही आपोआपच सोडून याल सर्व काही. आपोआप सगळ्या वाईट सवयी सुटतील. हे लोक असे आलेले आहेत बाहेरुन, कीं त्यांना ड्रग्जचं मोठं ॲडिक्शन होतं. त्यांचे चेहरे बघा, पटणार नाही तुम्हाला. सगळं सोडून एका रात्रीतं. पण त्यांच्यासारखे आपण नाहीं आहोत. आपण अर्धवट आहोत या बाबतीत. ना धड आपण साहेब आहोत, ना हिंदुस्थानी आहोत. एका रात्रींत सगळ्या गोष्टी यांनी सोडलेल्या मी पाहील्या आहेत. जेव्हां कुंडलिनीचं जागरण तुमच्यामध्ये होतं आणि त्याने तुमचा संबंध सगळीकडे

पसरलेल्या त्या परमचैतन्याशी होतो. मग त्यांचं असं म्हणणं की तुम्ही इथे राहून ही ट्रिटमेंट कां करीत नाही. म्हणजे काय, मला हा धंदा कां वाटायचा आहे? आमची मर्जी. जे करायचं ते आम्ही करणार. आज हजारो माणसं सहजयोगांत आलेली. अगदी सर्वसाधारण माणसंसुध्दा सर्वांना बरी करतात, आणि इतके फायदे झालेले आहेत. गावोगांव खेडोपाडी किती फायदे झालेले आहेत.

आणि ज्या त-हेने आपल्यामध्ये अज्ञान इतकं जास्त झालेलं आहे त्याचं आश्चर्य वाटतं पण त्याला कारण असं आहे, की अजून सायन्सबद्दलही आपल्याला कांही विशेष माहीती नाही. कीं सायन्स हे कोणत्या हयाच्यावर जाऊन पोहोचलं आहे आतां, आणि तिथून ते कसे परत येतात. सायन्सच्या त्या शेवटच्या स्थितीतून आतां ते असं लक्षातं घेत आहेत की हयाच्यापलिकडे कांहीतरी असलं पाहीजे.

पण ज्यांनी कधी फ्राईड वाचला नाही, युंग वाचला नाही, ज्यांना कांही ज्ञान नाहीं, काही नाही, त्यांच्याशी काय बोलायचं? म्हणजे बुध्दिवादावर. पण ज्यांनी कांहीही वाचलेलं नसतं, अगदी साधे, मनाचे भोळे त्यांना कांही सांगायला नको, कांही नको. सरळच त्यांना पार होता येतं आणि जे शिकलेले लोक आहेत त्यांनी मात्र एवढं लक्षात ठेवलं पाहीजे की अजून आम्हाला सत्य मिळालेलं नाही, जर मिळालं असतं तर आम्हाला सगळ्यांना एकमेव सत्य मिळालं असतं, सगळ्यांना एकच विश्वास झाला असता. ते कुंडलिनीच्या जागरणानेच होतं कारण त्याच्यामुळे तुमच्यामध्यें सामूहिकता येते. म्हणजे अंग प्रत्यंग होता तुम्ही. म्हणजे सांगावं लागत नाही. जसा हा माझा हात आहे, याला जर दुखणं झालं तर त्याची मदत करतो, त्याला सांगावं लागत नाही, तूं त्याची मदत कर. आपोआपच होतं, सामूहिकतेने.

आता हे म्हणाले, माताजींनी नुसतं माझ्याकडे पाहीलं, आणि मला दुखलं आणि हे झालं, त्यांना जर मी माझ्या अंगात घेतलं म्हणजे समजा, ते माझं अंग प्रत्यंग आहे तर त्याला नीट करणं कांही कठीण आहे का? ती जर माझ्यात शक्ति असली तर।

पण कोणालाही असं म्हणायचं की हे फ्रॉड आहे, फ्रॉड कशासाठी करायचं? मला काय तुमच्या पैशाची गरज आहे? मला काय न्यूजपेपर चालवायचा आहे? फ्रॉड कशासाठी करायचं? प्रत्येकाच्या मागे तुम्ही हात धुऊन लागला तर ते चुकीचं आहे. ज्या लोकांच यांनी केलेलं आहे त्याबद्दल मीही म्हटलं आहे. चूक आहे, त्यांच्या चुका आहेत त्यांनी भोंदूपणा केलाय, पण जे सत्कर्म होतयं, तिकडे लक्ष न देता तुम्ही एकाच काठीने सर्वांनामारायला सुरवात केली मग काय म्हणायचं "भूतांच्या हाती कोलीत?"

आता कुंडलिनीबद्दल उद्या मी सविस्तर बोलणार आहे. तो विषयच गंभीर आहे. सर्वांनी शांतपणे ऐकून घ्या. पण आज सगळ्यांनी सांगीतलं, "माताजी तुम्ही याच्याबद्दल बोलून घ्या." मी म्हटलं, "कशाला मला याच्यांत घालता तुम्ही. तर नाही. माताजी, तुम्ही बोलून घ्या. हे अंधश्रध्दा निर्मूलनवाले आहेत.

ही वेळ कृतयुगाची आली आहे. आता कलीयुग संपून कृतयुग आलेले आहे. परमचैतन्य कार्यान्वित होईल हे म्हटलेलं आहे पण ज्यांनी "ग" चा गणपती जाणलेला नाही, त्यांना सांगून उपयोगाचं काय? कांही भरकटलेलं घ्यायचं आणि लोकांची दिशाभूल करायची. मी म्हणते, की आहेत चुकीच्या कांही- कांही गोष्टींमध्ये अंधश्रध्दा आहेच. पण तुम्हाला कसं कळणार, खरं भूत कोणांत आहे, आणि खोटं भूत कोणांत आहे, ते तुम्हाला कसं कळणार? पण आहे. अंगात येतं ते आहे खरी गोष्ट आहे आणि त्याची सिध्दतासुध्दां आम्ही देऊ शकतो. पण कोणी बसून विचार करेल तर आम्ही सांगायला तयार होतात. पण हे कसे होतात. त्याच्यामुळे कोणते रोग होऊ शकतात. कॅन्सरचा रोगसुध्दां यानेच ट्रिगरींग होतो.

पण आम्ही याची एवढी पब्लिसिटी कां करत नाही, कारण मग प्रत्येक मनुष्य, आतां हे मल्होत्राच माझ्याकडे रोज माणसं ठीक करायला पाठवायचे. मी म्हटलं, आतां मीच तुझ्याकडे पाठवीन! मला दुसरं काम करायचं आहे. माझं काम कुंडलिनी जागृतिचं आहे आणि ते मुख्य कार्य आहे. त्याच्यामध्येंच तुमची तब्येत ठीक होते. प्रकृति ठीक होते. मानसिक स्थिती ठीक होते. संतुलन येतं आणि सगळ्यांत म्हणजे, तुम्हाला सत्य मिळतं. तुमच्या हातांच्या बोटांवर तुम्ही सांगू शकतां, कोणाला काय रोग होतात. आणि फक्त एवढच शिकावं लागतं की हे कसं नीट करायचं. जर हे सगळं आम्ही तुमच्यांसाठी केलेलं आहे, तर उगीचच त्याला नाही म्हणण्यांत काय अर्थ आहे!

"उपासना आणि सहजयोग" याविषयी प्रश्नाचे उत्तर देतानां—कांहीं दिलं मला, पाणी, मी ते स्वीकारीन पण त्याने एका शब्दावर नाचवलेंय. पण भक्ति कशी पाहीजे, "अनन्य". आतां या शब्दाला तुम्ही समजलेलं नाही. म्हणजे कृष्ण कसा होता? राजकारणीच होता की नाही? तो म्हणजे दिव्यत्वाचा राजकारणी त्याला असं वाटलं असेल, की यांच्या डोक्यात कांही जाणार नाही, म्हणून एका "अनन्य" शब्दावर सगळी भक्ति आणून ठेवली. मी, किंवा दुसरा कोणी नाही, म्हणजे आत्मसाक्षात्कारी. म्हणजे असं आहे, जर तुमच्या टेलिफोनचं कनेक्शन लागलं नाही, तर तुम्ही कोणाला हांका मारतां? कोणाची उपासना करता? आधी तुमचं कनेक्शन नको कां लागायला? आधी कनेक्शन झाल्यावर, उपासनेला अर्थ आहे.

वेद आणि सहजयोग याविषयी :-

विद शब्दाचा अर्थ तुमच्या नाडयांवर, म्हणजे सेंट्रल नर्व्हस सिस्टिमवर जो बोध होतो त्याला विद शब्द आहे आणि सुरुवातीलाच लिहीलं आहे; वेदांमध्ये, ज्याला बोध झाला नाही, त्यासाठी बेकार आहे. आणि संबंध असा आहे की त्यावेळेला तीन प्रकारच्या आपल्याकडे संस्था होत्या, एकतर वैदिक, दुसरी होती भक्तिची, आणि तिसरी अत्यंत गहयतर अशी, कुंडलिनीची. ती सर्व, कुंडलिनीची कार्ये इथेंच. नाथपंथीयांनी केली होती. सुरवातीस मच्छिंद्रनाथ, वगैरे लोकांनी हे कार्य इथे महाराष्ट्रांत

केलेलं आहे. कुंडलीनी जागृतीचे काम. दुसरे जे होते वेदाचे वगैरे, आम्ही त्याला राईट साईडेड म्हणतो, म्हणजे मॅटरला, कसं त्याचं सायन्स कसं डेव्हलप करायचं, त्यानेच आपलं सायन्स डेव्हलप झालेलं आहे. भक्ति म्हणजे परमेश्वराकडे ओढ व त्याच्याबद्दलची आवड, तर ती भक्ति, आणि ते विद होणे, आणि कुंडलिनी जागृति हे तिन्ही आमच्या सहजयोगांत सामावलेले आहेत.

प्राणायाम आणि सहजयोग :-

प्राणायाम वगैरे सगळे जे कांही आहेत प्रकार, ते जिथे, गरज लागते, तिथे वापरले पाहीजेत. उगीचच प्रत्येकाने प्राणायाम करायचा हे चुकीचं आहे. प्रत्येक गोष्टीला शास्त्र आहे. प्रथम आम्ही कुंडलिनीचं जागरण करतो. त्याच्यामध्ये जिथे कुठें अटकाव आला तिथे, समजा, तुमच्या हृदयचक्रावर अटकाव आला, तर आम्ही तुम्हाला प्राणायाम सांगू. पण प्रत्येकाने उठला तो प्राणायाम करायचा असं नाही. मंत्राचं पण असं आहे. मंत्रसुध्दां ते सिध्द करणारा पाहीजे. पहिल्यांदा, आणि कुठे कोणचे म्हणायचे ते माहीत असलं पाहिजे. जो त्रास असेल तोच मंत्र म्हटला पाहीजे. आणि काय झालयं, की प्रत्येकाच्या हातात ते मिळालं असल्यामुळे, वाटेल तसं वापरलं आहे म्हणून ते बदनाम झालं असलं, तरी आहे ते खरं आहे.

**श्री माताजींचे पुण्याच्या जाहीर सभेतील दुस-या दिवसाचे भाषण** 27 डिसेंबर 1989

सत्य काय आहे? सत्य एक अशी शक्ति आहे जिला परमचैतन्य असे म्हणतात. ही परमशक्ति सर्व जिवंत कार्य करीत असते.

सृष्टीमध्ये नाना प्रकारचे चमत्कार रोज दिसतात. पण सगळयांत मोठा चमत्कार परमेश्वराने केलाय, तो म्हणजे, मानव. या मानवामध्ये त्याने जी व्यवस्था करून ठेवलीय ती अत्युत्तम आहे असे लक्षांत ठेवलं पाहीजे की आपल्या उत्क्रांतीमध्ये जे जे टप्पे आपण गांठले त्या टप्प्यांचंच एकेक चक्र झालेलं आहे. म्हणजे सर्वात प्रथम मुलाधार. हे चक्र आहे त्या ठिकाणी मूळाचा आधार आहे. मूळ म्हणजे काय, तर आपली कुंडलिनी. परदेशी देशांत आपण बघतो, त्यांची बाहयात फार प्रगती झाली आहे. पण ते आपल्या मूळांना ओळखित नाहीत. त्यामुळे लोकांची अशी परिस्थिती आहे, की ते अत्यंत आशंकित आहेत, भयभीत आहेत, की आतां आमची काय स्थिती होणार? सायन्समुळे त्यांनी मशिनी बनविल्या. मशिनींमुळे असे प्रश्न उभे राहिले आहेत की भयंकर परिस्थिती उत्पन्न होणार आहे. अशी त्यांना भिती वाटते कारण त्यांच्यामध्ये कोणतेच संतुलन नाही. एक विचार करायचा तो बुध्दीने, एकीकडे, एकाच ओढीने असा वहातो आणि थोडया वेळात त्याची शक्ति संपली की आपल्याकडेच येतो.

सायन्स!, सायन्स!, सायन्स!, सायन्समध्ये तुम्ही काय बनवलंय? एकतर अॅटम बॉम्ब बनवून ठेवला. तिकडे हायड्रोजन बॉम्ब बनवून ठेवला. ते बनविल्याशिवाय सायन्स संपतच नव्हतं. आता ते राक्षस बनवून ठेवले तेव्हां तिकडे ते थोडेसे थांबले. त्यांनी स्पुटनिक बनवलं, आकाशांत जायचे, अंतराळात जायचे. काय मिळाले त्यांना, करोडों रुपये खर्च करुन? किती देशांत लोक उपाशी मरताहेत, त्यांना खायला नाही. त्यांची परिस्थिती खराब आहे. पण हे सगळे पैसे बेकारच्या गोष्टी करण्यासाठी, स्वतःचा मोठेपणा दाखविण्यासाठी; म्हणून म्हणा, किंवा आपल्या अहंकारासाठी म्हणून म्हणा, लक्षावधी रुपयांचा व्यय करुन कुठे गेले? तर म्हणे चंद्रावर!, काय मिळालं तुम्हाला? सायन्सचे थोडे बहुत आपल्याला फायदे झाले पण नुकसान जास्त झालं आहे.

हे जर तुम्ही परदेशात जाऊन पाहीलं तर, इथे राहून पुण्याच्या या वातावरणांत राहून तुम्हाला कळणार नाही. जवळजवळ प्रत्येक देशांतून मी फिरलेली आहे. त्यांची परिस्थिती पाहून आश्चर्य वाटतं. त्यांच्याकडे कोणतीही गोष्ट नैसर्गिक नाही. अंडयापासून भाजीपर्यंत सगळं अनैसर्गिक. रोज न्यूजपेपरमध्ये असे लिहून येते की आज ही भाजी खाऊ नका, यात्यामध्ये हे घातलेले आहे. दुसरे हे खाऊ नका, त्याच्यामध्ये अमुक घातलेले आहे. सगळेच अनैसर्गिक, कॉटनचा कपडा इतका महाग आहे. कॉटन अंगाला घालायला मिळत नाही. ही त्यांच्या मशीनची स्थिती कारण जर मशीन धबाडाप्रमाणे सुरु झाली तर ती भरलीच पाहीजे. नाही भरली तर ती बेकार जाणार. मग कांहीही काढत रहा. प्लास्टीकचे जाळता येत नाही. पाण्यांत घालता येत नाही. ते बुडत नाही असा राक्षस आहे, त्याचे काय करावे ते कळत नाही. तेव्हा असे आपल्याला वाटते ते लोक सौख्यांत असतील तर ती चुकीची कल्पना आहे.

दुसरे म्हणजे त्यांची कुटुंबव्यवस्था अगदी मोडकळीला आली आहे. त्यांना कुटुंब म्हणजे काय माहीत नाही. नितीमानतेने कसं वागायचं माहीत नाही. सगळे अगदी वेडटपणाने वागतात. आतां त्यांत आम्ही सहजयोग उभा केला, ज्यांना धर्म माहीत नाही, गणपतीचा ग माहीत नाही. ते पाहीलंना, "भारुड" तुम्ही. खेडेगावांत जाऊन शिकले आहेत. तिथे खेडेगावांत यांचे खूप मित्र आहेत. तिथे कोल्हापूरला वगैरे. कुठे शिकून आले, मला माहीतसुध्दा नाही, काय भारुड यांनी काढलं आहे ते. तर एकंदरीत आपल्याला हा विचार केला पाहीजे की हे लोक, ज्यांच्यामागे आम्ही धावत सुटलो आहे त्यांनी काय मिळवलं? इतका तिथे व्हायोलेन्स आहे, अशांतता आहे, इंग्लंडमध्ये एका आठवडयाला दोन मुलांचा खून होतो. आईबाप करतात. अमेरीकेत जर तुम्ही दागिने घालून गेले, तर कोणी तुम्हाला भोसकेल, मारेल इतका तिथे व्हायोलेन्स आहे, अशांतता आहे. मी जाते तर साहेब म्हणतात सगळं काढून जा. मंगळसूत्रसुध्दा काढून जा. मी म्हणते, तेवढं राहूं द्या, तेव्हढं कोण घेणार आहे माझं. इतकी भयंकर परिस्थिती आहे तिथे आणि त्या परिस्थितीतसुध्दा आपले हिंदुस्थानी कसेतरी राहात आहेत बिचारे, इतका

त्यांना तणाव। इतका त्यांना त्रास आहे त्यांच्या जीवनाचा. इथे आलं की त्यांना अगदी शांत वाटतं. बा। काय आपल्या हिंदुस्थानात आपण आरामांत आहोत.

त्यांच्यापासून आपल्याला हे शिकायचं की ते हे जे शिकले, आम्हाला आमची मुलं आता शोधून काढायची आहेत आणि आपल्यालाही आपली मुलं शोधून काढायची आहेत आणि ती मुलं इथे हिंदुस्थानांत, म्हणजे आमच्या महाराष्ट्रांत आहेत. पण महाराष्ट्रांत असेही कांही लोक आहेत, त्यांच्या डोक्यांत कांही जात नाही. आज प्रेस कॉन्फरन्स घेतली माझी. तिथे एका बाईच्या प्रश्नावरून मला कळलं, हे लोक माझ्या कां मागे लागलेत, त्यांनी विचारलं, "माताजी जर तुम्ही सगळेच रोग ठीक केलेत तर डॉक्टरांचं काय होणार?" म्हटलं, आता कळलं की या डॉक्टरांना अशी भिती वाटतेय कीं जर सहजयोग वाढला तर ह्यांच्याकडे कोणी पेशंट येणार नाही. अहो, आपल्याकडे इतके आजारी आहेत. या अठरा वर्षांत माझ्याकडे किती पेशंट आले? आणि सांगायचं म्हणजे तुम्ही श्रीमंत सगळे लोक घ्या. मला गरीबांना तरी ठीक करू द्या. मी सांगून ठेवते, मला श्रीमंत नकोत मला श्रीमंत पाहीला की घाबरायला होतं. आता काल ते बोलले ना तुमच्यासमोर ते दुसरा कोणी घेऊन आले की मी म्हणते, आलास तूं दुसरा घेऊन कोणी. इनकमटॅक्स कमिशनर, अमका, तमका. म्हटले, मला नको ते. मी गरीबांसाठी आहे करायला.

आपल्या देशामध्ये, लोकांना पैसे नाहीत, जेवायला, खायला पैसे नाहीत, तिथे अशी कांहीतरी किमया झाली पाहीजे, की कांही खर्च न करता लोकांच्या तब्येती ठीक झाल्या पाहीजेत. परत शेतीमध्ये सहजयोगाने फार प्रगति होते. फारच होते. तर या गोष्टी, ज्या जरूरी आहेत त्या केल्या पाहीजेत.

त्यांचं म्हणणं असं आहे की आम्ही फ्रॉड आहे. फ्रॉड म्हणजे इंग्लिश भाषेचा अर्थ लागलेला नाही त्यांना. फ्रॉड म्हणजे माहीत आहे का आपल्याला? फ्रॉड म्हणजे एखादा मनुष्य, जर तुमच्याशी खोटं बोलून, तुमचे पैसे खिसे मारले किंवा तुमचे कांही नुकसान केले तर ह्यांचं मी काय घोडं मारलं? आता मला कळलं, की यांना असं वाटतंय कीं मी जर आले तर यांच्या पोटावर पाय येईल! कसला काय येतो? तुम्ही खा भरपूर. कांही येत नाही.

सहजयोग पंचवीस वर्ष आपली जर वाढला, तरी किती लोक सहजयोगांत येणार? परत लायकी पाहीजे. पूर्व पुण्याई पाहिजे. असे पुण्यवान लोक आहेत कुठे कलियुगांत? फारच कमी. नामदेवांनी म्हटले आहे,

"पूर्वजन्मी आम्ही बहुपुण्य केले"

ते पुण्यवान पाहीजेत. ज्यांच्यामध्ये पुण्य नाही, त्यांना आम्ही कांही एक करू शकत नाही. बँकेत पैसे पाहिजेत ना खर्च करायला। जर तुमच्यांत पुण्याईच नाही, तुम्ही महादुष्ट आहांत,

रात्रींदिवस लोकांना छळतां, दुखवतां, त्रास देतां, कोणाचं सुख बघवत नाही तुम्हांला आणि कांहीतरी आपल्याच पोटाची तरतूद करत बसता. अशा लोकांसाठी सहजयोग नाही.

तसं म्हणा कोणत्याही औषधाची तुम्ही गॅरंटी देऊ शकत नाही. कोणत्याही डॉक्टरची देऊं शकत नाही. पण सहजयोगाचीच तुम्ही गॅरंटी द्यावी, असं हे मागणारे, आमच्याकडे, आव्हान! त्यांना काय अधिकार आहे आमच्याकडनं मागण्यांचा? आम्ही काय यांच्याकडनं पैसे घेतलेत? उलट माझंच आव्हान या लोकांना आहे, की आम्ही ज्या लोकांना बरं केलं, [आजसुध्दा नांवाने] तीन चार पेशंट उभे राहिले ब्लड कॅन्सरचे हे ते, त्यांनी इत्थंभूत सांगीतलं या दिवशी आम्ही हॉस्पीटलला गेलो, डॉक्टरकडे गेलो, त्याने सांगितले, तूं उद्या मरणार. सहजयोगाने ठीक झालो. आणि उभे होते तिथे. चारपांच वर्ष झाली त्याला. तरीसुध्दा डोक्यांत जात नाही त्यांच्या. तर काय सांगायचं त्यांना. हिंदीत अशी म्हण आहे, "बकरीकी तीन टांग।" म्हणजे काय? एक गृहस्थ म्हणायचे, बकरीला तीनच टांग आहेत. "अरे बाबा, चार आहेत." ते कांही नाही. मागची एक धरायची, एक दोन तीन,
मग म्हणायच "नाही". इकडची पकडायची मग परत. तसं ह्यांचं बकरी की तीन टांग.

आतां म्हणे हे नवीन पत्रक पाठवलं. ते ऐवढलं पाठवा म्हणावं, विचार करुन पाठवा. कोणाच्या पोटावर पाय येणार नाही हे सरं. आणि माझं आव्हान आहे, की ज्या लोकांना आम्ही ठीक केलेलं आहे आणि करतोय, तर दिल्लीला आमचं एक रेग्युलर क्लिनिक आहे. त्या क्लिनीकमध्ये आम्ही याचे प्रयोग केलेले आहेत आणि तीन डॉक्टरांना एम. डी मिळाली. ती काय फुकटात मिळाली कां? पण मला असा फालतूचा वेळ, मला घालवायला नको आहे. मला पुष्कळ कामं करायची आहेत आणि नसतं कोणी उद्यां आव्हान करेल की तुम्ही म्हणाला शिवाजीमहाराज आत्म-साक्षात्कारी होते आणि ते घोडयावर बसायचे तर तुम्ही घोडयावर बसा. काय प्रकार आहे? याला कांही अर्थ आहे? सरळ गोष्ट आहे. तुम्हाला कांही भ्यायची गरज नाही. काही तुम्हाला तसं लागणार नाही. तुम्ही बनवा पैसे, बनवायचे तितके. पण सहजयोगांत मात्र आम्ही बनवित नाही. पैसे घेत नाही. कारण हे परमेश्वरी कार्य आहे आणि परमेश्वराला पैसा आणि बॅंक समजत नाही. त्याला आम्ही तरी काय करणार.

आतां आपल्या देशांत इतकी गरीबी आहे. त्याच्याकडे कोणाचं लक्ष आहे कां? ती गरीबी कोणी काढणारच नाही. जर गरीबी काढली तर पांच रुपये देऊन व्होट कसे मिळतील? हे गरीब जर गेले तर पांच रुपयांत व्होट कोणी देइल का? त्यांचाही भाव चढेल मग. तर गरीबी जाणार नाही. तर जो मनुष्य जनकल्याण करीत आहे, ज्याने अनेकांचं भलं केलं आहे, त्याच्या मागे लागायचं, जर आम्ही एक पैसाही घेत नाही तुमच्याकडनं, तर आम्ही तुम्हाला कशाला ठगवूं. आणि बुध्दीतरी असायला पाहीजे त्याबाबतीत, थोडं शिक्षण पाहीजे. तर पुष्कळ गोष्टी समोर येऊ शकतात.

आता ह्या उपरान्त फक्त एक गोष्ट आहे, की कुंडलिनीचं जागरण हे कसं होतं असा मला पुष्कळांनी प्रश्न विचारला. त्याला एक "सहज" असा शब्द आहे. सह म्हणजे तुमच्या-बरोबर. ज म्हणजे जन्मलेला. हा तुमचा जन्मसिध्द अधिकार आहे की तुम्हाला हा योग प्राप्त झाला पाहीजे. जर तुम्हाला हा योग प्राप्त झाला आणि त्यायोगे जीव आणि आत्मा यांचा मेळ बसला तर, तुमच्या हाती हे परमचैतन्य लागेल आणि हे सारखे वहात राहील. यात तुमचं आमचं देणं काय लागतं? एक जर दिवा पेटलेला आहे तर दुसरा दिवा त्याने पेटवू शकतो.

आता आपल्यामध्ये ही सात चक्रे आहेत. पण षटचक्रभेदन फक्त होतं. सहा चक्रांतून कुंडलिनी उठते. सहा चक्रांचं भेदन होतं. सातवं हे गणपतीचं चक्र आहे. आणि ते आपल्या कुंडलिनीचं रक्षण करतं. ते गणपतीचं, म्हणजे ज्याला इनोसन्स म्हणतात, त्याचा अधिष्ठाता आहे. ते बालक आहे. चिरंजीव आहे. आणि नेहमी आपण त्या गणपतीला महाराष्ट्रात मानतो कारण सा-या विश्वाची कुंडलिनी या महाराष्ट्रांत आहे आणि अष्टविनायक त्याच्या कडेला बसून तिला संभाळताहेत. आतां असं म्हटल्यावर झालं, लोक मला म्हणतील हे कोण झाले सांगायला बुवा, बुवाबाजी। पण त्याचा पडताळा घेण्यासाठीसुध्दां आत्मसाक्षात्कार पाहीजे. अष्टविनायक आहेत की नाहीत, ते खरे आहेत की नाहीत, ते स्वयंभू आहेत की नाहीत, तुम्ही कसं जाणणार? ते खरं आहे की खोटं हे जाणण्यासाठी तुम्हाला कांही शक्ति आहे कां? विठ्ठल। 'विठ्ठल' हे खरं आहे की खोटं आहे. हे तुम्ही कसे जाणणार? यासांठी हातांत चैतन्य यायला पाहीजे. चैतन्य आल्यावर तुम्हाला लगेचच कळेल. जशी तुमची कुंडलिनी जागृत होऊन ब्रम्हरंध्र भेदेल त्यावेळेला तुमच्या लक्षांत येईल की तुमच्या हातातच काहीतरी वा-यासारखे वाहत आहे. म्हणजे चारीकडे पसरलेली ही शक्ति तुमच्या हातांत येते. त्याच्यानंतर कोणालाही जर पाहायचं असेल तर नुसते असे हात करायचे, त्या माणसाकडे, मग लगेच तुम्हाला कळेल की कोणत्या बोटामध्ये त्रास आहे ते. सहाचक्र आहेत जी वरची, खालचं मुलाधार चक्र आहे. नंतर मुलाधार आहे इथे कुंडलिनी बसली आहे. साडेतीन वेटोळे घालून. आहे. साडेतीन कां? त्यालाही गणित आहे आतां ते मी ह्यांना सांगू शकत नाही. पण ते ही लांबलचक गणित आहे तेही. आपण व्यवस्थित विचारून ठेवाव आणि आमची भाषणं आहेत त्याच्यावरती, आपण बघावे

तर ही कुंडलिनी जेव्हा कोणी अधिकारी असल्यावरच उर्ध्वमुखी होते आणि उर्ध्वमुखी झाली की ती अशी ब्रम्हरंध्रातूनच भेदते. ब्रम्हरंध्रातून भेदली की काल जसं तुम्हाला डोक्यातून थंड थंड वाटू लागलंय. त्याच्याबद्दल आदिशंकराचार्यांनी "सलिल सलिल" असे शब्द वापरले आहेत. बायबलमध्ये त्याला "कूल ब्रीझ ऑफ द होली घोस्ट" असं म्हटलं आहे. 'होली घोस्ट' म्हणजे हे कुंडलिनीचं प्रतिबिंब आहे. कुंडलिनी ही प्रतिबिंबीत आहे. होली घोस्ट ज्याला म्हणतात म्हणजे आदिशक्ति आणि तिचं प्रतिबिंब म्हणजे कुंडलिनी. आणि ही प्रत्येकाची वेगळी वेगळी

कुंडलिनी आहे. ती सगळं जाणते माझ्या मुलाने काय चुका केल्या. त्याला काय पाहिजे, काय नाही. आता पुष्कळ लोक असं म्हणतात, "मी फार पापी आहे माताजी, माझी कशी कुंडलिनी जागृत होईल?" आणि सटकन होते. असे कसे झाले? आतां झालं. म्हणजे तुम्ही उगीचच कसे स्वतःला नावं ठेवतां? तुम्ही पुण्यवान आहांत हे कुंडलिनी जाणते. पण एखादा मनुष्य फार मोठा आपल्याला साधु, संन्यासी असंलसं समजून आला, त्याची उठायचीच नाही कुंडलिनी. मग तो म्हणजे मी एवढं केलं तर माझी कां नाही उठत? त्याला कारण असं, तुम्ही पुण्यवान आहांत की नाही? परमेश्वराचा नुसता टाहो फोडून होत नाही. तुम्ही पुण्यवान आहांत, तुमच्या जीवनांत तुम्ही पुण्यवान आहांत, म्हणजे सगळ्यांच्याबद्दल समभाव आहे. सगळ्यांना तुम्ही प्रेमाने वागवितां, सगळ्यांना तुम्ही आदराने वागवितां तुमच्यामध्ये सगळ्यांच्याबद्दल हितकारी विचार असतो, त्या कुंडलिनीला हे सगळं माहीत असतं. एखाद्या दुष्ट माणसाची कुंडलिनी कधीच जागृत होणार नाही. कारण तो दुष्ट आहे. तसंच एखाद्याला नुसत पैशाचंच वेड असेल तर त्याची जागृत होणार नाही. पण जो समतोल असेल त्याच्यामध्ये संतुलन असेल त्याची कुंडलिनी सहज जागृत होते.

त्याच्यानंतर ही कुंडलिनी स्वाधीष्ठान चक्रामधून जाते. आज मी स्वाधीष्ठान चक्राबद्दल सांगीतलं आहे, बरंच विस्तारपूर्वक कारण स्वाधीष्ठानचक्र हे फार महत्वाचं आहे कारण स्वाधीष्ठानचक्र हे आपल्या पोटातलं जे काही मेद आहे त्या मेदाला मेंदूसाठी उपयुक्त करून घेतं. मेंदूमध्ये आपल्या ज्या ग्रे सेल्स आहेत, त्या मेंदूसाठी मेदाचं परिवर्तन करतात म्हणजे त्या ग्रे सेल्स ते बनवितात. आता डॉक्टर या गोष्टीला मानणार नाहीत कारण त्यांच्याजवळ ही गोष्ट नाही. मी स्वतः मेडिकल केलं आहे. मला माहित आहे, कीं त्यांना हे माहीत नाही. पण कोणत्याही गोष्टी त्याच्या परिणामावरून जाणल्या पाहिजेत. आता असं आम्ही हे गृहीत धरून चाललो की बरं, हे असं काम करतं, जो मनुष्य फार विचार करतो, जो मनुष्य आपलं डोकं फार वापरतो, जो मनुष्य नेहमी भविष्याच्याच गोष्टी विचारांत घेत असतो. त्याच्यामध्ये हे चक्र एकच कार्य करत असते, की जो पोटातला मेद आहे, तो मेंदूकडे पाठविणे. बरं, दुसरी कार्य त्याची जी आहेत, म्हणजे त्याचं लिव्हरं मग त्याचं पॅनक्रिआस, त्याची स्प्लीन. त्याची किडनी आणि इन्टेस्टाइनचा काही भाग, जो त्याला बघायचा असतो, किंवा त्याला जे त्या ऑर्गसना शक्तिचं दान, जे द्यायचं असतं तिकडे ते बघू शकत नाही. तिकडे त्याचं लक्षही नसतं, त्या सर्व ऑर्गन्समध्ये विकृति येते. मग मनुष्याला लिव्हरचं ट्रबल होऊ शकतो, त्याचा पुढे वाढून सिरोसिस होऊ शकतो. आमच्याकडे तीन चार इथे पेशंट आहेत ज्यांना सिरोसिस होऊन मरायला टेकले होते. त्याला परत, तो रोग नाही झाला, तर डायबिटीस होऊं शकतो. तो रोग नाही झाला, तर किडनी ट्रबल होऊं शकतो. पण सर्वात वाईट जो रोग आहे यामध्ये, तो म्हणजे ब्लड कॅन्सर जो स्प्लीनमुळे होऊं शकतो. आता आमच्याकडे नशिबाने दोन आर्किटेक्टस्

आले होते. ज्यांना फारच भयंकर परिस्थितीतून सहजयोगाने काढलेलं आहे. डॉक्टरने सांगीतलं की तुम्ही आठ दिवसांत मरणार. दोघांना. तर ते सहजयोगांत आले. आणि त्यांचा ब्लड कॅन्सर ठीक झाला.

आतां, हे कोणत्याही डॉक्टरांना रुचणार नाही, हे मला ठाऊक आहे. पण आपल्या डॉक्टर्समध्ये आणि परदेशातल्या डॉक्टर्समध्ये हा फरक आहे, की त्यांचं गुण-ग्राहकता आहे. गुणग्राहकता. फार झालं, पैसेबिसे फार कमवले आम्ही. ही गुणग्राहकता आहे. त्याने आम्ही लोकांची मदत करू शकतो. लोकांचं भलं करूं शकतो आणि त्या गुणग्राहकतेमुळे ते या कामाला झटून तयार आहेत आणि कितीतरी लोकांचं ते भलं करीत आहेत.

पण आमच्याकडे अशी पध्दत नाही, की तुमचं आम्ही भलं केलं तर तुमचं नावं नमूद करून ठेवायचं, असं करायचं. आपल्याकडे किती लोक जेवायला आले, तर ते आपण लिहून ठेवतो कां? तशांतलाच प्रकार. आता हे लोकं असे त्रास देतील, तर करूं, तेही करूं. पण तसं कांही बरं दिसत नाही. जे बरे झाले, ते झाले बरे. झालं, संपलं. त्याचं काय देणं घेणं लागतं? त्याची त्याची कुंडालिनी आहे, ती जागृत झाली. ते पुण्यवान होते, ते पार झाले, आम्ही त्यांच्यांत कांही देणघेणं करणार आहोत कां? तर, त्याचं नोंद करून ठेवायची, त्यांनी काय केलं ते. असं तसं आम्ही कांही करत नाही. व्यवस्थित आहेत, ठीक आहेत, आमचं समाधान.

अशाप्रकारे हे सगळे रोग नुसत्या एका गोष्टीमुळे होतात, की मनुष्य फार दूरचा विचार करत असतो आणि सारखं त्याला वाटतं की भविष्यांत माझं काय होणार, भविष्यांत मी असं करणार. आतां इथे मंडळी बसली आहेत, समजा इथे आतां वर्तमानांत बसण्याऐवजी त्यांनी आतां असा विचार केला की आतां मी गेलो तर मला बस मिळेल, की नाही, मग घरी गेल्यानंतर, बायकांना वाटत असेल घरी नवरा ओरडला तर, काय करायचं, पुरूषांना दुसरं कांहीतरी वाटत असेल. हे सगळे विचार जेव्हा आपण भविष्याचे करत असतो त्यावेळी आपण वर्तमानांत कांही राहात नाही. आणि सहजयोगांत तुम्ही वर्तमानांत उतरतां.

दुसरी गोष्ट आहे, ती म्हणजे तुम्ही आपल्या भूतकाळांत राहातां. पुष्कळ लोकांची ती सवय असते. आमचं फार चांगलं होते, आता फार वाईट झालं. आम्ही फार चांगले होते. विशेषतः हिंदुस्थानांत फार आहे. आमचे होते ही गोष्ट खरी आहे. पूर्वीचा जो काळ होता तो होताच चांगला. आणि आताचा काळ काही इतका चांगला दिसत नाही. ही गोष्ट खरी आहे, कबूल आहे. कारण माझं वय पुष्कळ असल्यामुळे मी सगळे दोन्ही काळ पाहीले आहेत. पूर्वीचे लोक, त्यांची ती शक्त, वागण्याची पध्दत म्हणजे कांहीतरी राजेशाही लोक सगळे. आणि काय त्यांना पाहीलेले आहेत. आम्ही असे महान लोक पाहीले आहेत. आमचे

आईवडीलच फार महान लोक होते· त्यांनाच बघून मला असं वाटतं की असे लोक आतां बघायला मिळालेले नाही· सगळं कॉंग्रेसच्या नांवावरती· घरदार सगळं कांही, आम्ही अकरा भावंड असताना, दोघंही जेलमध्ये· सगळं त्यांनी जाळून टाकलं· त्यांचे कपडे लंडनला शिवायला जात असत ते सगळे त्यांनी चौकावर जाऊन जाळले· जे लोक आम्ही महालांत राहाणारे जे लोक आम्ही झोपडीत जाऊन राहीलो पण आम्हाला वाटायचं गर्वाने, की आम्ही देशकार्यासाठी आमचे आईवडिल जाऊन राहीले · हे स्वातंत्र्यासाठी लोकांनी एवढा त्याग केला· स्वातंत्र्य मिळूनसुध्दा जोपर्यंत तुम्हाला "स्व"च तंत्र कळत नाही, जोपर्यंत तुम्हाला आत्म्याचं तंत्र कळत नाही, या स्वातंत्र्याला काही अर्थ नाही·

सहजयोगात लोक जेव्हां आले, तुम्हांला आश्चर्य वाटेल, तेव्हां त्यांचं नाभी चक्र जागृत झालं· हे दुसरं चक्र· नाभी चक्र जागृत झाल्यावर मनुष्यामध्ये एक प्रकारचं समाधान येतं, त्याची संसारिक परिस्थिती, व्यवहारिक परिस्थिती सुधारते· कारण त्याचं चित्त जे आहे ते भलत्या गोष्टीकडे जात नाही· आतां एक जर दारूडा माणूस असला तर लोक म्हणतील, "माताजी याची कशी जागृति होणार हा दारूडा आहे· पण होते हो, जागृति होते!, कशी होते ते मी सांगू शकणार नाही· मलाही आश्चर्य वाटतं!, पण होते· जागृतीच नाही होत, पण तोच माणूस, सहजयोगाला पुढे एवढा कामाला येतो, की कोणी म्हणणार नाही हा एवढा दारूडा होता, रस्त्यावर पडायचा!, पण तोच एखादा फार संभावित दिसणारा मनुष्य आला तर त्याची होतच नाही माझे हात मोडतात, म्हटलं, आतां करायचं बरं· आपल्या देशामध्ये, तुम्ही पुण्यवान आहांत, त्याबद्दल शंका नाही, नाहीतर या देशात जन्माला आला नसतां· काल बघा, कांही न करतां तुमची जागृत झाली कुंडलिनी· पण हे इंग्लंडमध्ये, माझे हात तुटतात हो· तिथे जागृत करायची म्हणजे काय सोपं काम आहे? माहीत आहे, कसे लोक आहेत हे? आणि त्याच्याहीपेक्षां खराब म्हणजे अमेरिकन लोक· ते तर अगदी मूढ लोकं आहेत, कां, काय झालयं त्यांना!, माझ्यामागे लागतील, आमची जागृत करा, जागृत करा, केलीच पाहिजे· तुम्ही माझ्यामागे लागलील नुसते· पण करं कशी? पुण्यवान नाहीत ते· तुम्ही पुण्यवान आहांत, याबद्दल शंका नाही कारण या महाराष्ट्रामध्ये विशेषकरून सगळीकडे चैतन्य खेळते, सगळीकडे·

तुम्हांला आश्चर्य वाटेल, मी एकदां लंडनहून येतांना, साहेब आणि आम्ही फर्स्टक्लासमध्ये बसलो होतो, तर मी म्हटलं, 'आले!' साहेब म्हणाले, "कसं कळलं तुला"? म्हटलं, "सगळीकडे चैतन्य आहे· हे हिंदुस्थानातच होऊ शकतं"· त्या पायलटला जाऊन विचारलं, की कुठे, हिंदुस्थानात आलो की काय? तर म्हणे, "हो· आतां दोन मिनिटांपूर्वी·" तर ते चैतन्य सगळीकडे पसरलेलं आहे· आणि तुम्ही इतके पुण्यवान लोक आहांत की तुम्हाला ते मिळूं शकतं· किती, कल्पना करूं नका· की, विदेशामध्ये जे काही झालं ते विशेष आहे, आणि तुम्ही फार मोठे सायन्टीस्ट आहांत· जे फार मोठाले सायन्टिस्ट आहेत, ते सगळे सहजयोगी आहेत आज·

त्यांनी सायन्सवर मात केली. ते सहजयोगी आहेत कारण ते शेवटी पोहोचले त्या कोप-यांत. की जिथे त्यांना वाटलं की याच्यापुढे कांहीतरी असलंच पाहीजे. तेव्हां ते वळले आणि त्यांनी सहजयोग घेतलेला आहे.

पण ज्याला म्हणतात ना, अर्धवट ज्ञान आहे त्याला काही समजणारच नाही गोष्ट. पुरतं ज्ञान ज्याला होईल की हे केवढ मोठं आहे? केवढं मोठं दिव्य आहे हो हे. आणि ते जनकल्याणासांठी, हे नियतिचं लिहीलिलं आहे, नाडीग्रंथामध्ये. जर आपण नाडीग्रंथ वाचला असेल तर. स्पष्ट लिहीलेलं आहे की असा सहजयोग येणार आहे आणि बरोबर त्याने डेटसुध्दां दिलेली आहे. एकोणीससे सत्तर सालापासून हा सुरू होईल. नाडीग्रंथ मूळ लिहिला होता संस्कृतात. ते गृहस्थ भजंदर. त्यांनी त्याचं बरोबर अशावत रूप आणलं तर एकोणीससे सत्तर सालांतच सुरू झाला. आणि हे भृगुमुनी किती जुने होते. त्यांनी लिहून ठेवलंय, पण ते हिंदुस्थानी होते म्हणून ते अनसायंटिफिक! असल्या हया गुलामीच्या कल्पना आहेत. स्लेव्हिशनेस आहे आपल्या डोक्यांत, असला हा. आपला वारसा जो आहे, एवढा मोठा, आपण मिळवलेला, तो आपण गमावणार आहोत का? कारण दोनचार शब्द तुम्ही शिकले आणि दोन चार शब्द, काहीतरी पाहीलं त्यावर तुम्हाला असं वाटतं! अहो, यांना शंभर जन्म घ्यावे लागतील, तेव्हां कुठे यांना महाराष्ट्रांत जन्म मिळेल. असे तुम्ही पुण्यवान आहांत आणि या पुण्याईची अशी तुम्ही वाट लावलेली. मला समजत नाही. कारण हे परदेशांतून आलेलं डोकं आहे, पण परदेशांत यातले कोणी गेलेले नाहीत, म्हणून हे असं बोलताहेत.

दुसरं म्हणजे, नाभी चक्रावरती मनुष्याला सगळ्यांत जास्त त्याची मदत होते ती ही, की नाभी चक्र एकदां संतुलनात आलं, म्हणजे त्याचे पोटाचे रोग नष्ट होऊन गुरू होण्याची शक्ति जन्माला येते. हे नाभी चक्र फार महत्वाचं आहे, ज्याची नाभी चांगली असेल, तो गुरू होऊ शकतो. गुरू म्हणजे, हे रस्त्यावरचे गुरू नव्हेत किंवा पैसे कमावणारे भोंदू नाही. गुरू म्हणजे ज्याला सद्गुरू म्हणता येईल. नानकसाहेबांनी म्हटलं आहे, "सद्गुरू वही जो साहिबी मिली है।" साहीब म्हणजे 'देवाता' जो साहीब मिली है। सहजयोगांत आल्यावर दैववादी होत नाही पण देववादी होतो कारण देवाचा साक्षात होतो. मग काय खोटं बोलायचं कां नंतर? कोणत्याही इमानदार माणसाने असं म्हणायचं कां, देव नाही, असं शक्य आहे? कारण त्याला साक्षातच होतो ना, त्याला हाताला लागतं.

आणि हे झाल्यावर जर तुम्ही तरीही म्हणाल की, नाही बुवा, आम्हाला पटत नाही तर म्हणा बरं, नमस्कार. आतां काय करणार? पण तसं बहुधा होत नाही. आता महाराष्ट्रांत, पुष्कळ लोकांना जागृति झालेली आहे आणि जागृतीने पुष्कळ लोकांना फायदा झालेला आहे.

त्याच्यावरचं चक्र जे आहे, ते हृदयचक्र. ते मधोमध आहे. आतां मी थोडक्यांत सांगन्ते. ते तुम्ही पुस्तकांत वगैरे वाचून घ्या. हे हृदयचक्र जे आहे, ते स्टर्नम बोनच्या

खाली, जी जागा आपल्या स्पायनल कॉर्डमध्ये आहे, तिथे आहे. या स्टर्नम बोनमध्ये अँटीबॉडीज तयार होतात. बारा वर्षापर्यंत अँटीबॉडीज तयार होतात आणि त्या सरोवर कांही नाही, पण देवीचे गण आहेत, कारण हे देवीचं स्थान आहे आणि ज्या वेळेला हे गण कोणाचाही बाहेरुन हल्ला आला तर जाऊन युध्द करतात. ते युध्द जे आहे, ते सुध्दां या देवीमुळेचं होतं. ही देवी जागृत व्हायला पाहीजे. पुष्कळ बायकांना ब्रेस्ट कॅन्सर होतो, त्याला कारण आहे असुरक्षितता. आम्ही ब्रेस्ट कॅन्सर पुष्कळ ठीक केले आहेत. सेन्स ऑफ सिक्युरिटी ज्यांची डिस्टर्ब होते, अशा बायकांना ब्रेस्ट कॅन्सर होतो. काहीपण चॅलेंज झालं तरी होतो. त्याला अगदी सोपा, सरळ इलाज आहे सहजयोगामध्ये. ब्रेस्ट कॅन्सरसाठी हे जे गण आहेत, त्यांना जागृत करण्यासाठी परत देवीचं आवाहन करावं लागतं. देवीची जागृति करावी लागते. पण त्याला अधिकार पाहीजे.

देवीची जागृति करण्यासाठी पण तुम्हालासुध्दा आत्मसाक्षात्कार झाला पाहीजे. जर तुम्ही नुसतं मी देवीला जाऊन येतो, मी हनुमानाला जाऊन येतो, तर तो देव नाही. तिथे काही मिळणार नाही. रोजच जाऊन येतो आपण, चकाट्या पिटत बसतो देवळांत. ते नाही. आपल्यामध्ये जे, बसवलेले देव आहेत, त्यांना ओळखलं पाहीजे, जागृत केलं पाहीजे पण मी म्हणते, म्हणून गोष्ट नाही आहे. हे सॉक्रेटिसनेपण म्हटलेलं आहे. तो तरी निदान हिंदुस्थानी नव्हता, तर त्याचं तरी म्हटलेलं ऐकायला काय झालं? लाओत्सेने म्हटलेलं आहे, तुम्ही याची नावच ऐकली नसणार. तर मी तरी काय करणार? आणि सगळीकडे डेइटीज (देवता) आहेत म्हणून मानतात. लोक मानत नाहीत, अशांतली गोष्ट नाही पण आपल्याकडे एक त-हेचं अर्धवट ज्ञान झाल्यामुळें, ना धड इकडे, ना तिकडे, असं झालं आहे. आपल्याला कांही समजत नाही. तर इकडे देवीचं स्थान आहे आणि देवीला जागृत केल्यावरती, ब्रेस्टचे त्रास असतील किंवा तुमचे आणखी कांही, पाठीचं दुखणं वगैरे असे काही त्रास असतील तर ते सगळं ठीक होऊन जातं.

मग ही कुंडलिनी वर आली की ती मग विशुध्दी चक्रावर येते, हे श्रीकृष्णाचं स्थान आहे. काल आपण वेदांवर विचारलं होतं, की वेदाचा काय संबंध आहे तो असा - की 'भू भुर्वः स्वाः" असं म्हणतात, पण तेव्हढयावर संपत नाही की भू म्हणजे पृथ्वी, पृथ्वीतत्वाने बनविलेलं मुलाधार चक्र आहे. भुर्वः म्हणजे अंतरिक्ष. अंतरिक्ष बनवलेलं आहे ते स्वाधिष्ठान चक्राने. स्वाः म्हणजे आपल्या पोटामध्ये आपण सगळं स्वाहा करतो, अग्नि असतो म्हणून स्वाः आणि स्वधा या दोन शक्त्या आहेत. स्वाः आणि स्वधा म्हणजे धारणा. आपला धर्म जो आहे, तो पोटांत आहे. दहा धर्म आपल्यामध्ये आहेत. हे दहा धर्म माणुसकीचे धर्म आहेत. जेव्हा तुम्ही त्या माणुसकीच्या धर्मातून पवित्र होता तेव्हां तुम्हाला कांहीतरी ना काहीतरी त्रास सुरु होतो. तेव्हां हे दहा धर्म आपोआप कुंडलिनी आली आंत, की जागृत होतात म्हणून स्वधा आणि मग हे मन. हे मन आहे. इथली शक्ति मनाची शक्ति आहे. मन जर दुबळं झालं,

मन जर दुबळ झालं, मनाला जर दुःख झालं, तर पकडलं जातं. आतां असं म्हणायचं की तुम्ही समाजाला दुबळे करतां, आतां इयांतले सहजयोगांतले कोणचे लोक दुबळे आहेत, हें तुम्ही बघूनच घेतलं आहे. ही विशुध्दी या चक्रावरती जन आहे. जन म्हणजे जनसंपर्क म्हणजे विशुध्दीतूनच हे आपण सरवायकल प्लेक्सस म्हणतो, तर सरवायकल प्लेक्ससशी संबंध आहे याचा. इया हातांनीचण लोकांना जर नमस्कार करायचा झाला कांही, तर तर या हातांनीच, जनसंपर्क साधतो. हे विशुध्दि चक्र श्रीकृष्णाचं आहे. आहे किंवा नाही हे आम्ही सिध्द करून देऊं तुम्हाला. पण आधी जागृति घ्या. तुम्हाला हिस्टॉलॉजीतलं कांही बघायचं असलं, तर तुम्हाला मायक्रोस्कोप लागतो ना. जर तुम्ही म्हणाल नाही, मायक्रोस्कोपशिवायच दाखवा, तर कसं दाखवणार? आम्ही मायक्रोस्कोप वापरणार नाही, आम्हाला दाखवा. असल्या चॅलेंजला कांही अर्थ आहे? आहे, मायक्रोस्कोप पाहीजे त्याला. तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाल्याशिवाय कांहीच होणार नाही.

आतां हे विशुध्दी चक्र म्हणजे श्रीकृष्णाचं स्थान आहे. आणि राधा त्याची शक्ति आहे. रा म्हणजे शक्ति, धा म्हणजे जिने धारणा केली ती. ती आल्हाददायिनी शक्ति आहे आणि श्री कृष्णाची शक्ति आहे, माधुरी, जो मनुष्य गोड बोलण्याचं, मधुर बोलण्याचं वैशिष्ठ्य आहे. आणि त्याने सोळा, तुम्हाला आश्चर्य वाटेल 16 सबप्लेक्स सेक्ष आहेत. सबंध इथे आहेत आणि त्याने आपले नाक, कान, जिव्हां सर्वांवर परिणाम येतो

मग त्याच्यावर आज्ञा चक्र आहे. आज्ञा चक्रावर ख्रिस्ताचा अवतार झालेला आहे म्हणून क्रॉस आहे. तिकडे आणि या क्रॉसमधुन ख्रिस्त निघाला. मग ख्रिस्त कोणी दुसरे तिसरे नसून श्री गणेशाचंच अवतरण आहे. श्री गणेशाचं अवतरण आहे की नाही त्यासाठी तुम्ही देवी महात्म्य वाचावं. त्यांत त्यांनी त्याला महाविष्णू म्हटलेलं आहे. अगदी तंतोतंत ख्रिस्ताचं वर्णन आहे. ख्रिस्त शब्द कुठनं आला? कृष्णापासनं ख्रिस्ट. आणि यशोदेचं नांव राधेनं. राधा म्हणजेच महालक्ष्मी आणि तीच म्हणजे मेरी. तिने यशोदेचं नांव त्याला दिलं. आपल्याकडे आपण म्हणतो ना, यशोदेला येसू, तसा ख्रिस्त हा येसू.

पोटांतसुध्दां आपल्या महंमदसाहेब आहेत. दत्तात्रेयच आहेत ते. हे आम्ही सिध्द करं शकतो आणि ते असं सिध्द करं शकतो, समजा एखादा मुसलमान आला, आणि त्याला आपण सांगीतलं की तूं दत्ताचं नांव घे, नाहीतर नानकाचं नांव घे, तर तो म्हणेल मी नाही घेणार. तर मग मी तुझं बरं करं शकत नाही. मला बरं करा, मला बर करा, मला पोटांत दुखतयं. त्याने जसं नानकाचं नांव घेतलं की झाले पार. तसंच एखादा हिंदू आला आणि त्याने म्हटलं. तै बर मोठं कठीण काम. पण महमंद साहेबाचं नांव घे. पण बर होतं त्याने. म्हणजे हे लोक खरे आहेत, खोटे नाहीत आणि ते आपल्यामध्ये वास करून आहेत, हे सहजयोगाने

सिध्द होतं. इतकंच नव्हे तर परमेश्वराचा साक्षात होतो. आतां दिसायला कसं वाटतं आपल्याला, असं कसं शक्य आहे, म्हणजे असं कसं होऊ शकतं? पण आहे ना, कां नाही? जर परमेश्वर आहे तर कधी ना कधी हे होणारच होतं. कधी ना कधी तो भेटलाच असतां, आणि त्याने जर तुमचे फायदे होतात, त्याने जर तुमचं हित होणार आहे तर कां करू नये? मला हे समजत नाही. त्यांत काय लॉजिक आहे.

बरं मग हे आज्ञा चक्र. आज्ञा चक्र हे पिट्युटरी आणि पिनीअल बॉडीच्या मध्ये एक चक्र आहे आणि ते दोन्ही या बॉडीजना, दोन त्याच्या पाकळ्या आहेत, त्याने संभाळतं. आणि ते बरोबर ऑप्टीकचायस्मा दोन ज्या ब्रेनला नर्व्हज येतात, त्याच्यामध्ये आहे. आतां हे डॉक्टर्स आहेत, पोचलेले डॉक्टर्स आहेत. इथल्या डॉक्टर्सच्या मानाने, तुम्ही पाहाल तर त्यांच्या लांबलचक पदव्या आहेत. ते लोक कसे सहजयोगात आले? आणि तेज बघा त्यांच्या तोंडावरचं, आपल्या कोणत्याही डॉक्टरच्या तेज दिसणार नाही तुम्हाला तोंडावरचं. किती तेजस्वीता त्यांच्यांत आहे. त्यांना दिसलं ते त्यांनी पाहीलं की आज्ञाचक्र वर धरलेलं असलं तर ख्रिस्ताचंच नांव घ्यावं लागत नाहीतर कुंडलिनी चढत नाही. आणि इथे धरलेलं असलं तर कृष्णाचंच नांव घ्यावं लागतं. उजव्या बाजूला विठ्ठलाचं आणि इकडे विष्णुमायेचं. पण आतां "विठ्ठल तो बरवा" म्हणत तोंडात तंबाखू घालून तुम्ही गेलांत तर तो विठ्ठल नाहीं मिळणार. कितीही तुम्ही वाऱ्या करा. ही अंधश्रध्दा आहे, हे तुम्हाला सांगीतलं पाहीजे. तंबाखू कृष्णाला म्हणजे एखाद्या संभावित माणसाला राक्षस भेटावा तसा प्रकार आहे तो. तंबाखू अगदी निषिध्द आहे, पण आपल्या महाराष्ट्रात तंबाखूशिवाय होत नाही लोकांना. पण मी म्हणत नाही तंबाखू सोडा, आधी म्हणत नाही. तंबाखू घ्यायची आणि श्रीकृष्णाचं नाव घ्यायचं म्हणजे त्यांच्या विरोधांत जायचं, आणि त्यांचं नांव घ्यायचं. लोकांना मोठा राग येतो. माताजी असं काय म्हणतात. आम्ही तंबाखू खल्ली तर. अहो, तुम्ही श्रीकृष्णाला एवढं मानता ना? मग तुमचं हे कसं खराब होतयं? तुम्हाला थ्रोटचा कॅन्सर कां होतोय? "हरे रामा, हरे कृष्णा" त्यांत ते लोक येतात. त्यांना सबंध ते थ्रोटचं कॅन्सर. म्हटलं अरे, तुम्ही रामाचं आणि कृष्णाचं नांव घेता, तुम्हाला हे कसं काय होतं? आतां रामाचं स्थान, ते किती मोठयं, त्याची आम्हांला माहीती नाही. ते आमच्याकडे आम्ही राइट हार्टला म्हणतो. अस्थमाचा रोग जो, तो श्रीरामाच्या उपमर्दामुळे होतो. आणि तो कसा काय होतो, ते सुध्दा मी तुम्हाला सांगेन कधीतरी. ते बरंच लांबलचक आहे. पण हे लक्षांत घ्या की हा विषय गंभीर आहे. आणि यांत उतरण्यासांठी थोडे तरी आपल्याला जाणलं पाहीजे. तुम्ही आत्मसाक्षात्कार घ्या.

शेवटी मग ते सहस्त्रार. ते सहस्त्रार कुठे आहे. असा डोक्याचा ट्रान्सव्हर्स सेक्शन घेतला तर कळ्या दिसतील तुम्हाला, जशा काही पाकळ्या आहेत. पण जेव्हां कुंडलिनी जागृत होते, या मेंदूमध्ये प्रकाश येतो आणि त्या प्रकाशाने मनुष्य प्रगल्भ होतो. पण तरी, 'बकरीकी तीन टांग, तुम्ही फ्रॉड आहांत! आहो, पण हे सगळे आहेत ना समोर, ते असूनसुध्दां तुम्ही फ्रॉड आहात असला प्रकार त्याला कोण काय करणार?

आता पुणेकरांबद्दल एक ठप्पा आहे, कीं ते चिकित्सक आहेत. त्याचं मला हरकत नाही. चिकित्सक असले पाहीजे. त्याचा अर्थ असा की तुम्ही स्वतंत्र आहांत. पण घेतात नसलं पाहीजे, ताळतंत्र नाही सोडला पाहिजे. चिकित्सक असणे हे स्वतंत्रतेचं लक्षण आहे. ते मला आवडतं. ते पाहिजे. तुम्ही स्वतंत्र झाल्याशिवाय "स्व" च तंत्र जाणूं शकत नाही. आणि सहजयोगांत तुम्ही पूर्णपणे स्वतंत्र होता म्हणजे तुमच्या सगळ्या सवयी सुटतात, तुमचे सगळे रोग नष्ट होतात, तुमची भाषा बदलते, तुमचा स्वभाव बदलतो, सगळं होऊन तुमच्यामध्ये परिणाम असा येतो की तुम्ही एकदम -

आमचे साहेब म्हणतात ना, कीं सगळे देवदूत आहेत तुझे. तुला सगळे देवदूत भेटले नी मलाच कसे सगळे राक्षस मिळाले? ऑफिसमध्ये नेहमी म्हणतात, तुझ्याकडे सगळे देवदूत आले आहेत. आहेतच. कारण त्यांचा स्वभाव इतका; आतां ही मंडळी कोणी पाहीली आहेत कां अशी? प्रेमळ मंडळी. इतका फरक होऊन जातो माणसामध्ये, संबंध त्याची, कायापालट म्हणतात ना? आतां शांतीचे इतके लोकं पोवाडे गातात. शांतीचे पाठ, मग त्याचे फाऊंडेशन्स बनवलेत मग कुठे काय, खूप पैसे एकत्र केले आहेत लोकांनी. त्यांच्यामध्ये कांही शांती आहे का? आता ही बाई, मदर तेरेसा, इतके तुम्ही तिचे महात्म्य करता तिने कोणाचं भलं केलंय? त्या लोकांना जे मरत आहेत त्यांना बिचा-यांना कलकत्याच्या लोकांच्या पैशांनी आणून ठेवतात आणि त्यांना ती ख्रिश्चन करते. आतां गाढवांना जर उद्या ख्रिश्चन केलं तर ते कायख्रिश्चन होतात काय? तर तिचं एवढं महात्म्य आहे. पण ती एवढी अशांत बाई आहे, कीं तिला एकदां पाहीलं तर माझं एवढं. त्या बाईला एकदां सहजयोगांत बुडवलीच पाहीजे. एवढा रागीट स्वभाव आहे बाईचा, की काय विचारायला नको, जेव्हां राग सुटतो त्या बाईचा, तेव्हां इकडून तिकडे, तिकडून तिकडे नुसता डान्स करतात की बस! मी तर बघतच राहीले अगदी. म्हटलं हा काय प्रकार आहे. म्हटलं असं समाज- कार्य करण्यापेक्षां स्वतःचंच कार्य करा. अशी परिस्थिती।, पण आपण बाहयातलं बघतो. गहनांतलं बघत नाही. गहनांत बघीतलं पाहीजे, कीं खरोखर ज्याने सगळ्यांचं हित होइल, असं काय आहे आणि आपल्यामध्ये जी धनसंपत्ती आहे ती कां वापरू नये? आणि त्याचा उपयोग

कां करून घेऊं नये? ते सहजच मिळतं, त्यासाठी पैसे नको. काही नको नुसती थोडीशी पुण्याई लागते. ती जरूर लागते, हे मी म्हणेन. पण तुम्ही स्वतःबद्दल चांगले वाईट विचार करून घेऊ नका. तुम्ही काहीही चूक केली नाहीत. परमेश्वर निराकरण करूं शकत नाही. कारण हे जे परमचैतन्य आहे ना, ते, क्षमेचा सागर आहे तो. तेव्हां, मी ही चूक केली, हे मी पाप केलं, घोर अन्याय केला, असा कांही विचार करायचा नाही.

आतां ही एक दुसरी टूम आहे कीं कोणाकडे गेल्यावर तुम्ही फार पापी आहांत, असके आहांत, आम्हाला थोडे पैसे द्या, म्हणजे आम्ही देवाला सांगतो तुमची पापं ठीक करतो. हे असली कामं करणं, म्हणजे मूर्खपणाची. "तुमची आई मेली, मला एक गाय द्या. यांना गाय देऊन आईला कसं मिळणार हे।. पण असे आहेत प्रकार. अशा प्रकारांना आळा घातला पाहीजे पण ते सुध्दा आत्मसाक्षात्कारीच करू शकतो.

तेव्हां आता शेवटलं सहस्त्रार, त्याच्यामध्ये साती चक्रांची पीठं आहेत आणि जेव्हां कुंडालिनी वर येते तेव्हां हे सहस्त्रार असं उघडतं आणि या ब्रम्हरंध्रातनं अशी कुंडालिनी निघून असं थंड थंड डोक्यातनं वाटायला लागतं. आतां महाराष्ट्राचा विशेष वारसा आहे, मी आपल्याला सांगते. हे कार्य अनादि काळापासून महाराष्ट्रांत झालेलं आहे. मार्कण्डेय स्वामी जे होते त्यांच्याही आधी मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ हे होते. तेव्हां आपल्यालाही त्याचा लाभ होणं हे सहाजिकच आहे. त्यांनी इथे रक्त ओतलयं.

आज इथे यांनी सांगीतलं, की संतांना सगळ्यांनी त्रास दिलेला तर माताजी तुम्ही कांही वाईट वाटून घेऊ नका. मला कसलाच त्रास नाही. मला कसला त्रास झाला आहे? असं वाटतं, इथे मारामा-या नकोत. तुम्हीं इतकी नाटकं करायची काय गरजं आहे? पत्र लिहा, माझ्याकडे या, भेटा मला, मी चार माणसं बोलवते, डॉक्टर्स आहेत, आमचं प्रॉपर क्लिनीक आहे. सगळे पेपर्स आहेत, ते तुम्ही बघा. तुम्हाला इथे नाटकं करायची काय गरज आहे? निदर्शने करणार ! मी काय पोलिटीकल मनुष्य नाही. आणि हे करून मग हे पोलिसवाले वगैरे, उगीचच तुम्ही कशाला आणता? आणि लोकांनाही भिती बसते. ते येत नाही म्हणजे उगाच ते, "डॉग इन द मॅन्जर" सारख. इंग्लिशमध्ये म्हणतात, तशांतली ही पध्दत. याला काही अर्थ आहे का? समंजसपणा धरायचा, आणि सहजयोगांत उतरलं पाहिजे.

त्याचं असं नाही आहे सहजयोगामध्ये. तुम्ही जागृत झालात, झालं।. दोनचार दिवस तुम्हाला फार बरं वाटेल. कुंडालिनी आहे ना, ती परत परत खाली वर करते, तर कृपा करून, जर तुम्ही सहजयोगांत आज पार झालांत, तर असं नाही समजायचं, कीं आतां तुम्ही

अवधूत झाले. त्याच्यानंतर थोडसं प्रॅक्टिस करून जमवावं लागतं. एका महिन्यांत तुम्ही गुरू होणार, म्हणजे सद्गुरू आणि तुम्ही हे कार्य करू शकता.

इथे आम्ही फार निवडक लोक बोलावले आहे. पण त्यांची शोधकवृत्ति फार गहन आहे. विचारपूर्वक आहे, आणि एकदां आल्यावर जमतात, इतकी मेहनत करतात. अहो, चार वाजतां उठून आंघोळी करतात. ध्यानाला बसतात. वाटलं तर दहाच मिनीटं बसतील, आणि इतकं यांचं आयुष्य सुंदर झाले आहे. त्यांच्यात कोणीतरी लांछन नाही राहीलं. "चंद्रमा जैं अलांछन, मार्तंड जे तापहीन". हे जे ज्ञानेश्वरांनी पसायदान लिहीलं आहे, ते आमचंच वर्णन आहे सगळ्यांचे. हे जे "हवेत उडतां" वगैरे ते ज्ञानेश्वरांनी लिहीलेलं नाही. कारण हे भूतबाधेचे प्रकार आहेत व पाण्यावर चालण्याचं ख्रिस्ताला जमलं कारण ते ओंकारच होते मुळी. बाकी हे त्यांनी लिहीलेले नाही. कोणीतरी लिहीलं आहे कारण लहानपणी मी ज्ञानेश्वरी वाचली होती त्यांत हे नव्हतं. कांती तुमची उज्वलीत होते. तुमचं वय लहान होतं, तुम्ही शक्तिवान होता. तुमचे आरोग्य वाढत जाते असे, वगैरे वगैरे म्हणजे माझं आतां सत्तरावं वर्ष होईल. थोड्यांच वर्षात, पण मी इतकी मेहनत करते आहे मला माहीतच नाही माझं वय किती! अशी स्थिती आहे. थकवाच येणार नाही तुम्हाला. कारण अव्याहत वरून ती शक्ति तुमच्यांत वहात राहील, आणि ती वहात राहील्यावरती तुम्हाला ती संपल्यासारखं वाटतच नाही. थकल्यासारखं वाटतच नाही. आणि असं होणं जरूरी नाही कां? त्यांच्यांत काही भांडणं होत नाहीत. आतां इतक्या देशांतले लोक आहेत, त्यांच्यात काही भांडण नाही, तंटा नाही. लोक तर आश्चर्यचकित होतात. आतां परवा एका ठिकाणी थांबलो होतो ते म्हणाले, माताजी, असे लोक आम्ही पाहीले नाहीत, हे काय स्वर्गातले देव आहेत कां काय? देवसुध्दा भांडतील पण हे, इतक्या शांतपणाने सगळे। यांच्याजवळ सिगरेटसुध्दा नाही. गांचसपण नाही." म्हटलं, आता हे झाले मुक्त. आता त्यांना कशाचीही कदर नाही. आतां फक्त आत्म्याचाच आराम बघतात. त्याची अनेक उदाहरणे आहेत आपल्याकडे. नामदेवांच सांगते मी. गोरा कुंभारांना भेटायला गेला होते. चिखलांत उभे गोरा कुंभार. त्यांना बघून काय म्हणतात की "निर्गुणाच्या भेटी आलो सगुणाशी"। किती गौरवाची गोष्ट आहे की निर्गुण तुझ्यावर साकार झालेला, सगुण मी बघतो आहे. हे नामदेव म्हणू शकतात आणि ते गोरा कुंभाराला, हाच आत्म्याचा जो एक पडताळा आहे, किंवा एक जी कांही जाणीव आहे, ती आपल्याला झाली पाहीजे. आता आपण दुस-या माणसाला कधीही जवळचं मानूं शकत नाही. पूर्ण वेळ हे माझं घर, ही माझी माणसं. मी कोण? मी कोणी आहे हे विचारलं पाहिजे, आणि तो जो मी आहे, तो तुमचा आत्मा आहे. आता मेडिकलमध्ये ऑटोनॉमस नर्व्हस सिस्टीम आहे. पण ऑटो कोण? ऑटोमोबिल आपण म्हणतो, पण त्याचा ड्रायव्हर कोण?

कितीतरी गोष्टींचा यांना पत्ता लागलेला नाही तो हळूहळू सहजयोगांत येऊन, पत्ता लागू शकतो. मग ती आपली दृष्टीच बदलून जाते, इंटरेस्टच बदलून जातो. आपला इंटरेस्ट रहातो की, आतां किती लोकांना मी पार करू? किती लोकांसाठी धावूं? किती लोकांना या परमेश्वराच्या साम्राज्यात आणून बसवूं? बाकी सगळं कांही विसरून जातो मनुष्य कारण इतका आनंद असतो त्यांच्यात म्हणजे एखादा दारूडा असला तर त्याला एकटी दारू पितां येत नाही तसंच आहे. परमेश्वराचा आनंद, एकटा नाही उपभोगता येत. इतके सुज्ञ हे लोक झाले आहेत, आता.

आता तुम्ही सगळ्यांनी सहजयोगांत यावं आणि हे प्राप्त करावं. आणि त्यांत जमलं पाहीजे. मुख्य म्हणजे जमलं पाहीजे. आमचे सेंटर्स असे सोन्याने मढवलेले नाहीत आणि त्याच्यामध्ये मार्बल वगैरे कांही नाही. कारण सर्वसाधारण, सामान्यांसाठी आहे. ते सामान्यांसाठीच सहजयोग आहे आणि सामान्यांतूनच असामान्य निघणार आहे, तेव्हां तुम्ही याचा स्वीकार करावा. जे स्वतःला फार असामान्य समजतात, त्यांच्या याच्याशी काहीही संबंध नाही. ते स्वतःला फार श्रीमंत समजतात, त्यांनी बनावे. पण आम्ही सामान्य लोकांच्या भल्यासाठी आहोत. आणि त्यांच्यासाठी मेहनत करत आहोत कोणीही सहजयोगामध्ये कधीही एकही पैसा या कार्यासाठी घेत नाही. तेव्हां सगळे म्हणतील, हे कसं काय झालं? या लोकांनी थोडेबहुत पैसे एकत्र करून काय झालं असेल ते झालं असेल. पण ते मंडपासाठी. कुंडलिनी जागृतीसाठी नाही. तेव्हा कोणी मनुष्य तुम्हाला सांगेल, याचे तुम्ही पैसे द्या, तर त्याला म्हणायचं तूं भामटा आहेस, देवाचे तुम्ही पैसे करू शकत नाही. ही भामटेगिरी मिटवली पाहीजे. पण त्या पातळीला यायला पाहीजे. तुमच्यामध्ये ती शक्ति यायला पाहीजे. शक्ति येईल तेव्हां तुम्ही ते कार्य करूं शकतां, नाहीतर ते करूं शकत नाही. जे कराल, ते आंधळ्यासारखे काठी घेऊन सगळ्यांना मारत सुटाल म्हणून ही जी एक आपल्यामध्ये विशेष शक्ति आहे, तिची जागृति करून घ्यावी. आणि तिला प्राप्त व्हावे. आपण संतशिरोमणी म्हणतो, लोकांना नमस्कार करतो, तो मग कुठेही असेना कां, कोणत्या जातीचा असेना कां, आपण त्यांना नमस्कार करतो. तेव्हां त्यांच्यावरचा विश्वास टळूं देऊ नका. ते खरे आहे. आपली हितकारी लोकं होती, त्यांना आपण छळलं, त्रास दिला, पण त्यांनी आपली सत्याची कास सोडली नाही. त्यांना सांगावं लागत नव्हत. असं करा, तसं करा, अशा संतांच्या भूमीवर तुमचा जन्म झालेला आहे. ही संतांची महान भूमी आहे, तर तिला काळं फासूं नका कारण तुम्हाला थोडसं पुस्तकी ज्ञान किंवा सायन्सचं थोडसं ज्ञान आलंय। जे सायन्सच्या वरचे लोक, आणि तसंच तुम्हीसुद्धा होऊं शकतां, कारण बुद्धीच्या पातळीच्या पलीकडे सहजयोग आहे. तेव्हा बाजारभुणग्यांचं इथे काम नाही. भैरागवाल्याचे इथे काम नाही, अहंकारी लोकांचं इथे काम नाही. इथे फक्त सामान्य जन, अगदी सामान्यांतले आपण

आहांत· तेव्हां तहत गुरु नानकापासनं, कबिरापासनं, नामदेवापासनं तुकाराम, रामदास केव्हढे लोक झाले हो। नांव घ्यायचं म्हटलं तरी जीव भरुन येतो। आणि सगळ्यांत शेवटी, तुमचे साईनाथ झाले· हे सरे होते, साईनाथ तुमच्या इथे येऊन राहुरीला त्यांनी काम केलं· इतकी मेहनत केली, त्या पीरआमध्ये· तिथेच आश्चर्याची गोष्ट आहे· तिथेच मच्छिंद्रनाथ, तिथेच गोरखनाथ, तिथेच सगळे आमचंही पुराणं तिथलंच· आम्ही शालिवाहनांचे वंशज आहोत· आणि शालिवाहनांचं राज्य तिथेच होतं· औरंगजेबसुध्दां तिकडेच झाला· अशा त्या पवित्र भूमीमध्ये, चैतन्य सगळीकडे पसरले आहे·

आणि या पुण्याचं नांव शास्त्रांत पुण्यपठ्ठणम आणि इथे तुम्ही जन्मलात ही केवढी तुमची पुण्याई, तेव्हां आपला छळ आता करुन घेऊ नका आणि हे जे आहे तुमच्यामध्ये "तुझे आहे तुजपाशी" ते घेऊन घ्या·

आतां आपण आज प्रश्न वगैरे विशेष विचारणार नाही कारण त्याला काही अर्थ नसतो· प्रश्न असले तर लिहून द्या· आम्ही तुम्हाला त्यांची उत्तरं पाठवू· माझ्याशी भांडायची काही गरज नाही· किंवा माझ्यावर चढाई करुन हे असं तसं हे काही नसतं वाघाचे आव्हान आणायची गरज नाही· सरळ गोष्ट आहे की अशी अशी कुंडलिनीचं जागरण होतं, त्याने लोकांच हित होतं· अॅग्रीकल्चरवर त्याचा परिणाम येतो· लहान मुलांवर त्याचा परिणाम येतो, मुलं सुसंस्कृत बनतात, चांगली बनतात आणि त्याने अनेक लोकांना लाभ होतो·

ईश्वर तुम्हाला आशिर्वादीत करो·

संक्रांतपुजा - कळवे 14 जानेवारी 1990

आजच्या सुमुहुर्तावर या भारत वर्षात सर्व ठिकाणी उत्सव साजरा होत आहे. याचं कारण सूर्य, जो या भारत वर्षाला सोडून मकरांत गेला होता तो आतां परत आला आहे. पृथ्वी आणि सूर्य यांच्या कार्यामुळे जे वनस्पति, खाद्य, अन्न वगैरे गोष्टी तयार होतात, त्या होण्याची वेळ आतां आली आहे आणि ज्या वृक्षांची पाने थंडीने पूर्ण झडून गेली होती, ते परत जागृत झाले आहेत. पल्लवित होऊ लागले आहेत. आणि या वेळेचं हे विशेष आहे, की पृथ्वी परत हिरवीगार होऊ लागेल. सगळीकडे परत कार्यक्रम चालू होतील.

सूर्याचं आगमन आपण फार उच्च प्रतीचं मानतो. सहजयोगाच्या सूर्याचं पृथ्वीवर येणं, त्याहून कितीतरी पटीने जास्त महत्वाचं आहे, कारण सृष्टीची जी कांही सृजनता आहे ती सूर्यामुळे प्रवाहित होते आणि सूर्य देव तिला चालना देतात आणि परमचैतन्याची जी सृजनशक्ति आहे, त्याचे जे अंगीकृत घटीत कार्य आहे, त्याची चालना सहजयोगामुळे घटीत आहे. आजपर्यंत परमचैतन्य कोणत्याही कार्यामध्ये उतरलं नव्हतं याचं कारण हे होतं, की त्याचा सूर्य अजूनपर्यंत त्या प्रांगणांत उतरला नव्हता. पण आतां हा सूर्य या परमचैतन्याच्या प्रांगणांत उतरला आहे आणि यामुळेच आपणा सर्वांमध्ये त्याचा प्रकाश आला आहे. या प्रकाशामुळे आपली कुंडलिनी जागृत झाली आणि आपल्या आंत जी एक सृजनभूमी होती ती पूर्णपणे हिरवीगार झाली आणि या सृजनभूमीमध्ये आपण अशा तऱ्हेने संबोधित झाला आहात की साऱ्या विश्वाला यांतून लाभ होणार आहे ही फार महान आणि दिव्य गोष्ट झालेली आहे अशी गोष्ट आधी कधीही होऊ शकली नाही.

असा दिवस कधी येईल, जेव्हां सामुहिकतेमध्ये परमचैतन्याची सृजनता जागृत होईल, यांवर आपल्याकडे अनेक ऋषीमुनींनी विचार केला होता. ती सृजनता आज जागृत झाली आहे. यामुळेच, हे नुसते पृथ्वीच्या सृजनतेचे एक पर्व नाही, पण सहजयोगाच्या सृजनतेचंसुध्दां एक मोठं पर्वच आहे. हे वर्ष, विशेषकरून सहजयोगासाठी फार महान वर्ष असेल आणि सहजयोगाचा प्रकाश अनेक गहन अनुभवांमध्ये उतरेल.

जेव्हां एखादी गोष्ट अत्यंत गहन अनुभवांमध्ये उतरूं लागते, त्यावेळेला त्याबरोबरच दुसऱ्या अनेक महान घटनासुध्दां घटीत होत असतात, हे सुध्दां समजून घेतलं पाहीजे. त्या घटना, ज्या विश्वांत आतंक निर्माण करीत आहेत, जगांतील उच्चतम गोष्टींचा नाश करीत आहेत, अशा सर्व लोकांचा नाश होणार आहे.

ज्याप्रमाणे अंकूर (कोंब) फुटूं लागतो त्यावेळी तो सत्य घेऊन आला (खरा) असेल. तर जिथे फुटूं शकत नाही, तिथे तो तुकडे करून टाकतो. आणि सर्व प्रकारे नाश करून टाकतो.

त्याप्रमाणे ज्या काही कुप्रवृत्त्या आहेत, ज्या आसुरी शक्त्या आहेत, त्या नष्ट होऊन जातील. सूर्य आल्यावर ज्याप्रकारे सगळा अंधःकार नष्ट होतो त्याप्रमाणे, सहजयोगाचा प्रकाश येतांच सा-या विश्वामधील अज्ञानाचा अंधःकार, दुष्टतेचा अंधःकार, पूर्णपणे नष्ट झाला पाहीजे.

तर आज आपण अशा उंचीवर उभे आहोत, जिथून एक खूप मोठी झेप (भरारी) आपल्याला घ्यायची आहे आणि ही भरारी घेतांना आपण समजलं पाहीजे की आपल्यामध्ये जो काही बोजा आहे, वजन आहे ते आपल्याला हलके केले पाहीजे. आपल्यामध्ये अनेक प्रकारच्या प्रणाल्या आहेत, अनेक चुकीच्या धारणा आहेत. आपल्यामध्ये अनेक त-हेचे अंधत्व आहे. हे सर्व अंधत्व आपल्याला सोडून दिले पाहीजे, आणि पूर्णपणे निःसंग होऊन, कारण ती झेप आम्हाला घ्यायची आहे. आणि जे लोक या गोष्टींना आपल्यापासून दूर करणार नाहीत, वेगळे करणार नाहीत. ते लोक ही भरारी घेऊ शकणार नाहीत. आपणा सर्वांना सहजयोगाचं महात्म्य माहीत आहे त्याचं दिव्यत्व माहीत आहे. आपण सर्वसामान्य नाही आणि यासाठीच मी ही गोष्ट सांगू इच्छिते की ज्याला आणखी जास्त उंचीला पोहोचायचे आहे, वर जायचे आहे, त्याला या, ज्या आपल्यावर लादलेल्या कुसंस्काराच्या सर्व बेडया सोडल्या पाहीजेत.

याप्रकारे आपल्या आंत अहंकार आणि अहंभावाची एक पर्वतप्राय नशा आहे. आपल्याला या पर्वतालासुध्दा पूर्णपणे नष्ट केले पाहीजे. त्याला नष्ट करण्याची पध्दती म्हणजे ध्यान, धारणा आणि पूर्णपणे सहजयोगांत रत होणे, पूर्णपणे शरण जाणे हेच आहे. जो सहजयोगांमध्ये शरणागत होत नाही तो अजून बराच अर्धवटच आहे आणि असेंही होऊ शकेल की या झेपेमध्ये तो मागे पडेल आणि बाकी सगळे लोक ज्या नरकामध्ये जाणार तिथे तो जाईल. त्यामुळे सर्व मंडळींनी पूर्णपणे प्रयत्न करणे फार जरूरीचे आहे. अर्धवट प्रयत्न करणारे लोक जे पुढे येतात, प्रयत्न करतात त्यांना मी असे सांगू इच्छिते, की कृपा करून हा अर्धवटपणा सोडून द्या. कारण या अर्धवटपणामुळे आपण कुठलीही गोष्ट प्राप्त करू शकत नाही. तर मग ज्या महान स्थितीसाठी लोक हजारो वर्षे तपस्या वगैरे करून, स्वच्छता राखून प्रयत्न करतात ती महान स्थिती आपण कशी प्राप्त करूं शकाल? स्वतःला कोणत्याही पध्दतीने कमी लेखण्याची किंवा दोष देण्याची गरज नाही, हे समजून घेतले पाहीजे. तरी आज आम्ही एका दर्पणासमोर उभे आहोत. आमच्यामध्ये दिसणा-या सर्व दोषांना आम्ही पूर्णपणे नष्ट केले पाहीजे. जेव्हां तुम्ही स्वतःपासून दूर राहून स्वतःला पहाल, तेव्हां तुम्हाला हे कळेल, की या सा-या गोष्टी अजून नष्ट करायच्या आहेत. आणि हे होतां होतां आपल्याला दिसेल की आपण अनेक आशिर्वाद प्राप्त कराल. त्याचप्रमाणे माणसाला असे वाटते की मला सर्व काही मिळाले. हे सुध्दां एक मोठे संमोहनच आहे, की आम्हाला ही गोष्ट मिळाली. ती गोष्ट मिळाली. आम्हाला जगातल्या गोष्टी मिळाल्या आणि याप्रकारे अशा

गोष्टी आपल्याला मोहित करूं शकतात. पण तिथे थांबता नये. आपण तर परमगति प्राप्त केली पाहीजे. जी जन्मजन्मांतरीची आपली पुण्याई आहे. तिला पूर्णतया प्राप्त केले पाहीजे. आणि आपल्यामध्ये ज्या छोटया छोटया इच्छा असतात, त्या सर्व सोडून पूर्णपणे शरणागत होऊन पूर्णतया योगदान घेतले पाहीजे.

ज्याने असे केले आहे, त्यालाच मिळेल. आणि जो कुठल्याही कारणामुळे असे करूं शकला नाही, त्याला मी हें दाखवू शकते की परमात्म्याच्या दरबारात इतकी जागा नाही. तिथे जाणा-ऱ्यांना सुध्दां विचार केला पाहीजे, की खरोखर आम्हांला तिथे पोहोचायचे असेल तर हे सगळे बोजे हलके केले पाहीजेत. आणि एकच मार्ग आम्हाला आत्मसात केला पाहीजे. एकाच दिशेने आमचा पूर्ण प्रयत्न झाला पाहीजे की [illegible] ह्या बाबूमध्ये आम्ही अग्रभागी रहावे आणि वृध्दिंगत होत रहावे.

दरवर्षी आपण स्वतःची छाननी केली पाहीजे. गेल्या वर्षी आम्ही जे होतो त्याहून आज कुठे आहोत. आपण बहाणे सांगत रहातो की आम्हांला हे करायचे आहे. ते जरूरी आहे इत्यादि विचार करत रहाते की हृदयापासून आमची अशी इच्छा आहे की आमची उन्नति व्हावी। बरेच लोक असाही विचार करतात की सहजयोगामुळे आमचा हा रोग बरा होईल, हा प्रश्न सुटेल असे होईल. तसे होईल तर त्यांना समजले पाहीजे की सर्व प्रश्नांचे उत्तर एकच आहे. आपण या स्थितीला पोहोचले पाहीजे जी "परम" आहे.

प्रत्येक काम आपलं आपणच होतं. आपल्याला काही करण्याची गरज नाही. माझी अशी इच्छा आहे की आपण आपल्या हृदयांत ही खूणगाठ बांधून ठेवा, की मी जी गोष्ट सांगते आहे, ती दिसण्यांत खूप सहज, सरळ आहे. पण मानवाच्या ज्या प्रवृत्त्या आहेत त्यांच्या ज्या हालचाली अशा प्रकारच्या विचित्र आहेत, की त्या मी सुध्दा समजू शकत नाही. असे म्हणतात की "समझ में आए तो क्यूंकर खुदा हो। पण मी म्हणते "समझ में आए तो क्यूंकर मनुष्य हो।" कारण मनुष्य इतका गुंतागुंतीचा आहे की त्याला समजणे फारच कठीण ।

मला तुम्हाला अशी विनंती करायची आहे की देवत्व प्राप्त करण्यासाठी माणसाची गुंतागुंत पूर्णपणे झिडकारली पाहीजे. तिला पूर्णपणे सोडले पाहीजे. आणि असे म्हटले पाहीजे की ज्यायोगे प्रत्येक वस्तू जिला आमचा स्पर्श होईल, ती पवित्र, चैतन्यमय आणि सुंदर होईल. असेच देवत्व आम्हाला प्राप्त झाले पाहीजे. तुमचे जीवन सुध्दा एक खूप सुंदर, खूप आदर्श, खूप जास्त आनंदमयी प्रेममय आणि एका उच्च प्रकारचे होऊन जाईल.

आपणा सर्वांना अनन्त आशिर्वाद.